कवित्रय मंडळ, सहकारी प्रकाशन
सोलापूर.

अंक ७ वा. प्रकाशन ७ वें. कला ७ वी.

…७ वा. वर्ष ७ वें.

…ह. १-७५



ग्रं. सं. ठाणें
काव्य


# काव्यसंग्रह


REFBK-0011998
REFBK-0011998


…६१

…१८८३

४६ कवींच्या ९२ कविता.


संपादकः-भ. वा. अघोर साहित्यविशारद, सोलापूर.

# ※ कवित्रय मंडळ सोलापूर ※

## - " सप्तमी " काव्यसंग्रहाचे मानकरी -


पृष्टें

सप्तपदी ३

१ भ. वा. अघोर, साहित्य विशारद सोलापूर १३

२ नारायण पंढरीनाथ जगदाळे
टी. डी. सी. पी. अेड्., साहित्यप्राज्ञ तडवळे २१

३ सौ. कुंताबाअी जगदाळे बी. अे. बी. टी. ,, २२

४ महादेव भिमाजी कुलकर्णी पुणें २३

५ विष्णुसुत अुंब्रजकर अूर्फ
रामचंद्र विष्णु कुलकर्णी, कऱ्हाड २५

६ ' कमलात्मज ' अूर्फ
मेघश्याम नरहर जोशी, कोरवली २७

७ रमाकांत आर्ते, जामनगर (गुजराथ) २८

८ सौ. कमलाबाअी सोहनी, मुंबअी २९

९ वासुदेव नरहर सरदेसाअी, सुरत (गुजराथ) ३०

१० पांडुरंग नारायण कुलकर्णी, सोलापूर ३१

११ सदानंद राम शिरोडकर.
मातोंडबांबर (रत्नागिरी) ३२

१२ ' लक्ष्मीकुमार ' अूर्फ
प्रभाकर भगवंत येळेगावकर सोलापूर ३३

१३ चतुर्भुज तुकाराम पाटील, पांगारकर,
पांगरी (नाशिक) ३४

१४ बजरंग शामराव सरोदे, रौंदळा (अकोला) ३८
१५ मनोहर बर्वे, पुणें ४१
१६ विष्णुपंत बाबुराव तानवडे, कुरोली-सिद्धेश्वर ४३
१७ सीताराम रा. बोरशे, जळगाव ४५
१८ रत्नाकर सीताराम बोरशे.
सीनि. बी. अे. जळगाव ४७
१९ 'श्याम' अूर्फ दा. ह. देवतळे,
पी. टी. आय्. आरमोरी ४९
२० विनायक केशव देशपांडे,
बी. अे. (ऑ.) बी. अीडी. मालवण ५१
२१ नीलकंठ जनार्दन मांदाडे, वडधा (चांदा) ५३
२२ सौ. लक्ष्मीबाअी नानासाहेब कुलकर्णी
'काव्यशारदा' सोलापूर ५५
२३ 'श्रीकृष्णाग्रज' अूर्फ
डॉ. वामन अनंत निपुणगे,
२४ सौ. सावित्रीदेवी निपुणगे,
२५ अवधूत भिमराव म्हमाणे,
२६ शा. सी. धनभर, वरवटबकाल (बुलढाणा) ६०
२७ मधुकर गोपाळ गरुड पालघर (ठाणे) ६१
२८ म. ना. श्रीखंडे, वरूड (अमरावती) ६२
२९ 'त्रिवेणीकुमार' अूर्फ व्यंकटेश माणिक
कोलंबीकर, पेठवडज (नांदेड) ६३

११९९८
REFBK-0011998
REFBK-0011998

३० 'धर्मतनय' अूर्फ
रामराव धर्माजी शिंगटवार पेठवडज (नांदेड) ६४
३१ मोहनलाल जनार्दन नसकरी
अुंबडीबाजार (अमरावती) ६५
३२ आनंद अंकुश खडपकर,
मिर्याबांदा (रत्नागिरी) ६६
३३ अिंदिराबाअी करकमकर, सोलापूर ६७
३४ प्रल्हाद अुद्धव वाघमारे, धानोरा (यवतमाळ) ६८
३५ वसंत शंकर बापट, वाकवली (रत्नागिरी) ६९
३६ चंद्रकांत परशुराम बीडकर, सातारा ७०
३७ 'यशवंतात्मज' अूर्फ
गोविंद यशवंत कुलकर्णी, सोलापूर ७२
३८ जगन वंजारी, अमरावती ७३
३९ भगवंत नागोराव फड मुरुंबा (परभणी) ७४
४० डॉ. अनंतराव सरदेसाअी म्हारदळ (गोवे) ७६
४१ वासुदेव मोरेश्वर भिडे, सोलापूर ७८
४२ अनिल चांदेकर, औरंगाबाद ८३
४३ 'शेखर' अूर्फ चंद्रकांत बिवरे
रा. भा. पंडित, प्रचारक, खोपोली (कुलाबा) ८४
४४ गुलाब सूर्यभानजी मेहरे धनजखुर्द (अकोला) ८६
अभिप्राय ८६
वाङ्मयगंगेचा सादर स्वीकार ९६

अनुक्रम ... दि: ... नों दि: ...

# सप्तपदी

कवित्रय मंडळाची स्थापना १९५४ सालीं होऊन १९५५ पासून दरवर्षीं गुढी पाडव्यास अेक काव्यसंग्रह प्रकाशित करीत करीत ७ व्या वर्षाचा ‘सप्तमी’ काव्यसंग्रह आज प्रसिद्ध करून मंडळानें ८ व्या वर्षात पदार्पण केलें आहे. मंडळातर्फें आत्तापर्यंत ७ काव्यसंग्रह, ६६ कवींच्या २८७ कविता व ३३२ पानें अेवढें साहित्य प्रकाशित झालें.

**षष्ठी काव्यसंग्रह प्रकाशन–** कवित्रय मंडळाच्या ६ व्या वाढ दिवसा निमित्त खास कवि संमेलन, काव्यसंग्रहांचें प्रदर्शन, षष्ठी काव्यसंग्रहाचें प्रकाशन वगैरे कार्यक्रम गुढी-पाडवा दि. २८–३–६० रोजीं मोठ्या थाटानें पार पडले. या दिवशीं सकाळीं पांडुरंग आश्रमाचे संचालक श्री. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे यांनी आपल्या आश्रमांत ‘षष्ठी’ काव्य-संग्रहाचें प्रकाशनाध्यक्ष प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख M. A. B. T. यांचें स्वागत व सत्कार केला. याप्रसंगीं “कवित्रय मंडळाचा, श्री. सरदेशमुख व श्री. भ. वा. अघोर यांचा विजय असो” अशीं रांगोळचांनी अक्षरें काढून भींतीवर कवित्रय मंडळाच्या १ ल्या वर्षापासून आत्तापर्यंतच्या सर्व प्रकाशनांचा आढावा त्यांनी रेखाटिला होता. अध्यक्षांना पुष्पहार घालून ते म्हणाले “कवि भ. वा. अघोर यांनी कवित्रय मंडळ स्थापन केलें, या मंडळाच्या कार्यास सजीव करण्याचें काम कवि संजीव यांनी केलें. कारण पहिल्या काव्यसंग्रहाचे ते प्रकाशनाध्यक्ष होते. पुढे या मंडळाची व्याप्ती वाढत वाढत आज देशभर झालेली असून मंडळाने सारा देश सर केला आहे. म्हणून ‘सरदेशमुख’ अध्यक्ष लाभले.” कविवर्य संजीव, मामा मुद्‌गल,

सरदेशमुख यांनी श्री. अघोर यांच्या वाङमयीन कर्मयोगाच्या सातत्याचें कौतुक करून श्री. घुगरदरे यांच्या कार्याचा गौरव केला.

दुपारीं ४–२५ ला षष्ठी काव्यसंग्रहाच्या प्रकाशनसमारंभास सुरवात झाली. रात्रीं ८ ला समारंभ संपला. कवि कमलात्मजांनी वैदिक मंत्रांची घोषणा करून समारंभाविषयी निवेदन केलें. अध्यक्षांच्या परिचय–सत्कारानंतर अध्यक्ष श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत 'षष्ठी' काव्यसंग्रह प्रकाशित झाल्याचें जाहीर केलें. श्री. अघोर यांनी मंडळातील कवींचे संदेश वाचून दाखवून मंडळांचा अहवाल, कार्याचा आढावा व प्रकाशनासंबंधी आपले विचार मांडले. कवि कमलात्मज, पां. ना. कुलकर्णी यांचीं भाषणें झाल्यांवर संग्रहाच्या समालोचनपर ४ वक्त्यांचीं भाषणें झालीं. नामवंत साहित्यिक पं. मा. कामतकर बी. अे. अेल्. अेल्. बी. वकील यांनी फारच सुंदर, मुद्देसूत व सहृदयतेने समालोचन करून संग्रहांतील कविता कशा हृदयस्पर्शी आहेत, हें पटअून दिलें. कविवर्य मामा मुद्रल यांनी प्रत्येक कवीच्या काव्यावर भाष्य करून कवि अघोर यांनी आज सतत ६ वर्षें हें प्रकाशनाचें कार्य धडाडीने व यशस्वीरितीने चालविलें असून भारतांतील सर्व प्रांतांतील कवींचें सहकार्य त्यांनी मिळविलेलें आहे. ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय आहे. असें सांगितलें. कवि दत्ता हलसगीकर यांनी संग्रहांतील उत्तम भाग निवेदन करून कार्याचा गौरव केला. काव्यसंग्रहाविषयी कविवर्य शं. गो. पटवर्धन यांनी आपलें मत काव्यांतच गुंफून गाअून दाखविलें. तें काव्य पुढे दिलेलेंच आहे. श्री. घुगरदरे यांनीं आपल्या भाषणांत

कोटचांचा भडिमार करून श्रोत्यांना चकित केलें. त्यांनी कवि अघोर यांचा गौरव करून समारंभातच त्यांना पुष्पहार घालून सत्कार केला. व अध्यक्षांच्या हस्ते त्यांच्या कार्याला ६ रु. ची देणगी दिली. अध्यक्षीय भाषण अतीव मनोहर, अतीव काटेकोरपणे व फारच विचारपूर्ण होऊन संग्रहाचें अुत्कृष्ट समालोचन त्यांत झालें. आभार प्रदर्शनानंतर हा समारंभ संपला.

**षष्ठी पासून सप्तमी पर्यंत**–★ कविवर्य कुंजविहारी यांनी आपल्या ओनामा मंदिरांत गुढी पाडव्यादिवशीं रात्रीं सांस्कृतिक कार्यक्रम केला. त्यांत त्यांनी श्री. अघोर व कवित्रय मंडळ यांचा गौरवपर अुल्लेख केला. ★ कवि ना. पं. जगदाळे व सौ. कुंताबाओी जगदाळे यांनी आपल्या जयहिंद विद्यालयाचें ' अंकुर ' हस्तलिखित कविवर्य संजीव यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकाशित केलें. दुसरें हस्तलिखित ' रानफुलें ' कविवर्य कुंजविहारी यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकाशित झालें. दोन्ही वेळेस सन्मान्य पाहुणे म्हणून श्री. भ. वा. अघोर हे अुपस्थित होतेच. अुभयतांनी हे दोन्हीहि समारंभ फारच हौसेने व थाटाने साजरे केले. या त्यांच्या दोन्हीहि वाङमयकृतीबद्दल कवित्रय मंडळातर्फे अुभयतांचें अभिनंदन करण्यांत आलें. ★ षष्ठीतील कवि ना. मा. तिडके यांनी ' काव्यजयंति ' व ' अुत्तररात्र ' हे दोन काव्यसंग्रह काढले. याबद्दल दोन्हीहि वेळेस मंडळातर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. ★ कवि पां. ना. कुलकर्णी यांचें ' श्रीविठ्ठल प्रदक्षिणा ' काव्यपुष्प कवि भ. वा. अघोर यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकाशित झालें, या काव्यपुष्पाबद्दल कवित्रय मंडळातर्फे त्यांचा सत्कार व अभिनंदन करण्यांत आलें.

* श्री. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे यांच्या ४९ व्या वाढ-दिवसानिमित्त श्री. चिं. रामदासी यांच्या अध्यक्षतेखालीं कवित्रय मंडळातर्फे २६–७–६० रोजीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. * कवि कमलात्मज हे ज्योतिषी व वैदिक आहेत. लोकांत धार्मिक प्रचार करण्यासाठी त्यांनी कांही धार्मिक प्रकाशनें करण्याचें ठरविलें. त्यांच्या या कृतीस धर्मशील लोकांनी सक्रिय अनुमोदन दिलें. त्यांच्या 'सेवा' संग्रहाचें प्रकाशन श्री. भ. वा. अघोर यांच्या अध्यक्षतेखालीं व 'भाव' संग्रहाचें श्री. दत्ता हलसगीकरांच्या अध्यक्षतेंखालीं झालें. या दोन्ही प्रकाशनांबद्दल त्या त्या वेळीं मंडळातर्फे त्यांचा सत्कार व अभिनंदन करण्यांत आलें. * म. सा. प. शाखा व कविमंडळ या दोन संस्थांची बैठक भरून दोन्ही संस्थानी संयुक्त रितीने वाङमयीन हलचाली करण्याचें ठरून याचें प्रात्यक्षिक म्हणून दोन्ही संस्थाचें अेक हस्तलिखित १५ ऑगष्टला प्रकाशित झालें. त्याप्रसंगीं म. सा. प. चे अध्यक्ष श्री. शं. गो. पटवर्धन म्हणाले "दोन्ही संस्थांचा हा हस्तलिखित संग्रह निघत आहे. पण आपले कविमित्र भ. वा. अघोर हे दरवर्षी छापील काव्यसंग्रह प्रसिद्ध करतात. त्यांच्याच पाउलावर पाऊल टाकून आपणहि तसा प्रयत्न करूं" याच मताचा पुरस्कार श्री. रा. गो. मोरे यांनी आपल्या भाषणांत व्यक्तविला. * कवि कमलराम यांचें 'भक्तिध्वजा' काव्यपुष्प प्रसिद्ध झालें. त्यांचा 'श्रीगुरुपाठ' हा काव्यसंग्रह प्रा. दे. द. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकाशित झाला. वरील दोन्ही वेळेस मंडळातर्फे त्यांचा सत्कार व अभिनंदन करण्यांत आलें.

★ दिवाळी निमित्त मंडळांतील सर्व कवींचें व मंडळाच्या सर्व काव्यसंग्रहांच्या प्रकाशनाध्यक्षांचें दिवाळी कार्डद्वारें अभिनंदन करण्यांत आलें. त्याच प्रमाणे संक्राती निमित्त वरील सर्वांचें संक्रांत कार्डद्वारें अभिनंदन करण्यांत आलें. ★ कविवर्य विंदा करंदीकर यांचा दि. २४–९–६० रोजीं कवित्रय मंडळातर्फे पुष्पहार घालून सत्कार करण्यांत आला. ★ सौ. कमलाबाअी सोहनी यांना मुंबअी सरकारच्या साहित्य स्पर्धेत त्यांच्या 'आतां पटलं' या अेकांकिकेला ३०० रुपयांचें पहिलें पारितोषक मिळालें. ही गोष्ट त्यांना व मंडळाला भूषणावह आहे. मंडळातर्फे त्यांच्यां या विजयाबद्दल अभिनंदन करण्यांत आलें. ★ अरविंदांच्या सिद्धी दिनानिमित्त कविवर्य नृसिंहाग्रज यांनीं आपल्या नरसिंहाश्रमांत दि. २४–११–६० ला समारंभ केला. त्याप्रसंगी त्यांनी कवित्रय मंडळाच्या 'षष्ठी' काव्यसंग्रहाबद्दल भ. वा. अघोर यांचें अभिनंदन व सत्कार केला. ★ म. म. दत्तो वामन पोतदार यांनी ७१ व्या वर्षांत पदार्पण केल्याबद्दल दि. ८–१–६१ रोजीं मंडळातर्फे पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करण्यांत आला.

★ राजकवि यशवंत यांना 'महाराष्ट्रकवि' पदवी मिळाल्याबद्दल १३–१–६१ ला मंडळातर्फे पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करण्यांत आला. ★ कविवर्य म. भि. कुलकर्णी यांचें पुणें नभोवाणीवर दोनदा काव्यगायन झालें. त्या त्या वेळीं मंडळातर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. ★ विष्णुसुत अंब्रजकर यांचें पुणें नभोवाणीवर दि. १–३–६१ रोजीं काव्यगायन झालें. मंडळातर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें. ★ कवि बजरंग सरोदे यांनी 'कलिका' हा प्रातिनिधिक संग्रह काढल्यांबद्दल मंडळातर्फे त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

* कवि भ. वा. अघोर हे यंदा 'साहित्य विशारद' ही परीक्षा अुत्तीर्ण झाल्यांबद्दल श्री. घुगरदरे यांनी आपल्या पांडुरंग आश्रमांत त्यांचा सत्कार केला मंडळांतील कांही कवींनी त्यांचें अभिनंदन केलें.

* यावर्षी कवि चतुर्भुज पांगारकर, बजरंग सरोदे, मनोहर बर्वे, विष्णुपंत तानवडे, सी. रा. बोरशे, र. सी. बोरशे, श्याम, वि. के. देशपांडे, नी. ज. मांदाडे, काव्यशारदा सौ. लक्ष्मीबाअी, श्रीकृष्णाग्रज, सौ. सावित्रीदेवी निपुणगे, अवधूत म्हमाणे, शा. सी. धनभर, म. गो. गरुड, आनंद खडपकर, अिंदिराबाअी करकमकर, प्रल्हाद वाघमारे, वसंत बापट, चंद्रकांत बीडकर, यशवंतात्मज, जगन वंजारी, भ ना. फड, वा. मो. भिडे, अनिल चांदेकर, शेखर, गुलाब मेहरे हे कवि–कवयित्री यंदाच मंडळाचे सदस्य झाले. आम्ही त्यांचें मनःपूर्वक स्वागत व अभिनंदन करतों. व मंडळाशीं त्यांनी कायमचा ऋणानुबंध ठेवावा अशी आम्ही त्यांना विनंती करतों. निपुणगे पतिपत्नी हे मंडळांतील दुसरें दांपत्य होय. जगदाळे व निपुणगे या दोन्ही कविदांपत्यांचें आम्ही अभिनंदन करतों.

**देणग्या:**–श्री. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे यांनी आमचें हें ७ वें प्रकाशन म्हणून त्यांनी ठरविल्याप्रमाणे ७ रुपये देणगी दिली. कवित्रय मंडळांवर त्यांचें फार प्रेम आहे. मंडळाला त्यांचें फार सहाय्य असून मंडळांतील सर्व घडामोडींची अत्यंत बारकाअीने व फारच आस्थेने ते चौकशी करतात. मंडळ व मंडळाचा काव्यसंग्रह या विषयींची अगदी बारिक सारिक माहिती, माझ्या खालोखाल त्यांनाच आहे. त्यांच्या

आस्थेचा व प्रोत्साहनाचा मी अत्यंत ऋणी आहे. श्री. पद्माकर व्यंकटेश देशपांडे कसबे तडवळे यांनी मंडळास ५ रुपये देणगी दिली. मंडळ त्यांचे आभारी आहे. श्री. तुळजाराम सदाशिव राजे व श्री. महादेव भीमाशंकर मेंगाणे या विष्णुमीलमधील कामगार बंधूनी गेल्यावर्षाप्रमाणें याहि वर्षी प्रत्येकी २ रुपये देणगी दिली. आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

संग्रहातील कविपैकी कांही कवि पदवीधर आहेत. कांहीनी मराठी भाषेचा खास असा अभ्यास केलेला असून मराठीच्या विशिष्ट अशा पदव्या मिळविलेल्या आहेत. कांहीनी हिंदी भाषेच्या पदव्या मिळविलेल्या आहेत. कांहीनी मराठी वाङ्मयांत बरीच तपें यशस्वीरितीने काढलेलीं आहेत. कांही शिक्षण क्षेत्रांत झळकलेले असून कांही शरीरशास्त्र निपुण आहेत. कांहींचे स्वतंत्र काव्यसंग्रह निघाले असून कांहींनी प्रातिनिधिक काव्यसंग्रह काढलेले आहेत. कांहीचीं नभोवाणीवर काव्यगायनें होतात तर सरकारतर्फे कांहींना पारितोषकें मिळालेलीं आहेत, कांहींचें साहित्य-अनेक दैनिक–साप्ताहिक–मासिकांतून प्रसिद्ध झालेलें आहे तर कांही या क्षेत्रांत न झळकलेले आहेत. अशा विविध योग्यतेचे कवि या संग्रहांत आहेत. आमचा सर्वांचा वाङ्मयीन प्रयत्न गोड करून घ्यावा, अशी आम्ही आपल्याशिवाय कोणाला विनंती करणार ?

प्राध्यापक निर्मलकुमार फडकुले अेम्. अे. यांनी सप्तमी संग्रहाचें अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल आम्ही त्यांचें आभारी आहोंत. कविवर्य मा. गो. काटकर व श्री. वर्तक यांच्या सौजन्यामुळे मंडळाच्या वार्षिक प्रकाशन समारंभास स्थान मिळतें. अुभयतांचे आम्ही आभारी आहोंत. संपादक ' तरूण भारत '

व संपादक ' मुलांचें मासिक ' यांनी आमच्या ' सप्तमी ' संग्रहाचें प्रसिद्धीकरण केलें. त्यांच्या या प्रोत्साहनाबद्दल आम्ही त्यांचें आभारी आहोंत. अनेकांकडून अभिप्राय आले. त्यांचें आम्ही आभारी आहोंत.

काव्यसंग्रह काढणें ही गोष्टच मुळीं फार कठीण आहे. त्यांतून प्रातिनिधिक संग्रह काढणें त्यांहून अवघड. त्यांहूनहि ठिक ठिकाणच्या कवींचा प्रातिनिधिक संग्रह काढणें, कठिणतर होय. व या सर्वांहूनहि अशातऱ्हेचा संग्रह ठराविक कालावधीनंतर सातत्याने काढणें तर अगदी म्हणजे अगदीच कठीणतम आहे. स्वानुभवाने मी हें सांगत आहे. आणि अनुभवाशिवाय या गोष्टीची कोणाला सत्यताहि पटणें शक्य नाहीं. अशातऱ्हेचा संग्रह काढतांना अनेक गोष्टी संभाळाव्या लागतात. अनेकांचीं मतें–मनें, अनेक बाबी–अडचणी–घटना वगैरें सारें सांभाळावें लागतें. कोणीकडेहि अधिक तोल गेल्यांस दुसरीकडचा भाग अुघडा पडतो. या सर्व गोष्टी सांभाळल्या पाहिजेत व संग्रहहि निघाला पाहिजे, अिकडे संग्रह काढणाराला लक्ष पुरवावें लागतें. या गोष्टींची जाणीव तशा तऱ्हेचा संग्रह काढणाऱ्या व्यतिरिक्त अन्यांना असूं शकत नाही. अशा संग्रहांवर अभिप्राय देतांना, तो देणाराची मनोवीणा त्यावेळीं असंगीत सूर काढीत असेल तर त्या संग्रहाचे ' तेरा ' ( प्रगतीचा काळ आहे हा ! ) वाजावयांस वेळ लागत नाही. आणि मग अशा तऱ्हेचे प्रयत्न सुकून जातात.

**अुतरती भांजणी**– गेलीं ७ वर्षें मी हें संग्रह प्रकाशनाचें कार्य करीत असून आमचा प्रत्येक काव्यसंग्रह प्रत्येक दैनिक साप्ताहिक-पाक्षिक-मासिक-वार्षिक यांच्याकडे जातोच. जितक्या ठिकाणीं संग्रह पाठविले जातात त्यापेक्षा थोडया कमी ठिकाणीं

त्याची कसलीहि नोंद येत नाहीं. त्याहिपेक्षा फार कमी ठिकाणीं त्याची नुसती पोच येते. त्याहिपेक्षा फार कमी ठिकाणीं अभिप्राय येतात व त्याहिपेक्षा कार कमो ठिकाणचे, अभिप्राय आलेले अंक येतात. अशी आमच्या संग्रहाबाबत अुतरती भांजणी होत आहे. १०१ ठिकाणीं संग्रह पाठवावेत, तेव्हां अेकाद्या ठिकाणीं अभिप्राय येतो. पुस्तक पाठविल्यांवर त्याची पोच व अभिप्राय देण्यांसाठी संपादक बांधलेले आहेत, असें मला मुळीच म्हणावयाचें नाही. पण अेकाद्या कडून अगत्यपूर्वक अभिप्रायासाठी अेकादें पुस्तक आल्यांस त्यांवर आपणांस जो वाटेल तो अभिप्राय देणें अथवा निदान त्याची पोच देणें सौजन्यपणाचें व सुसंस्कृतपणाचें होत नाही का ? असो. जसजसे आमचे संग्रह निघूं लागले आहेत तसतशी अभिप्राय येणाऱ्या अंकांची संख्या अलीकडे दरवर्षी अेकाद दुसऱ्या अंकानी वाढत आहे. अजून कांही वर्षांनी या अुतरत्या भांजणीला अुतरती कळा लागेल, असा आम्हांस विश्वास वाटतो.

फक्त काव्यसंग्रह काढून काम संपलें असें नसून वर्षभर या कार्याचा व्याप चालू असतो. अनेक कवि-रसिकांचे पत्रव्यवहार, विविध घटना-प्रसंग-समारंभ वगैरें कार्य वर्षभर चालूच असतें. अशा महत्त्वाच्या घटनांची नोंद वर दिलेलीच आहे. वर्षभराचा हा व्याप कांही सहजासहजी होत नाही. त्यासाठी बरेच परिश्रम घ्यावे लागतात. बराच खर्चही येतो. यासर्व गोष्टी विषयी व संग्रहाविषयी आमच्या कांही योजना आहेत. पण आर्थिक अडचणीमुळे त्या साकार होऊ शकत नाहीत. जनतेने या कार्यासाठी देणगीरूपाने सहाय्य केल्यास या कार्यास आम्हास रेखीवपणा आणता येअील. या काव्यसंग्रहातील प्रथम श्रेणीच्या अेका कवितेला कांही परितोषक द्यावयाचा विचार

आहे. अशा पारितोषकांसाठी रसिकांनी साहाय्य केल्यास या कार्यास आगळे स्वरूप येणार आहे. प्रकाशनासाठी व पारितोषिकांसाठी अत्यल्प देणगी सुद्धा स्वीकारली जाते. हा संग्रह जे कोणी वाचतील त्यांनी या संग्रहांतील प्रथम क्रमांकाची कविता कोणती, हें सकारण पत्राने कळवावें. ज्या कवितेला अधिक मतें पडतील त्या कवितेला, बक्षिस म्हणून रसिकांकडून देणगी आल्यांस बक्षिस दिलें जाओल. न आल्यांस फूल ना फुलाची पाकळी तरी दिली जाअील.

आमच्याप्रमाणेच अितरत्रहि अनेक प्रकाशनें निघत असून सर्वांचा मंडळाशीं पत्रव्यवहार होतो. जरुर तें सहकार्य त्यांना मंडळातर्फे दिलें जातें. या सर्व प्रकाशनांचें आम्ही अभिनंदन करतों.

मंडळांतील कवींना मागील काव्यसंग्रह हवे असतील तर निम्या किंमतींत प्रत्येक काव्यसंग्रहाची अेकेकच प्रत मिळू शकेल. ही सवलत मंडळातील कवी पुरतीच आहे.

**मंडळाचा वाढता व्याप-खर्च-संघर्ष** (२) वाढतें कामकाज-कार्यक्षेत्र (३) मंडळाची वाढती कविसंख्या (४) काव्य संग्रहाची वाढती पृष्टसंख्या-काव्यसंख्या (५) मंडळातर्फे होणारे वाढते समारंभ (६) अनेक कवींचें वाढतें सौजन्य व (७) मंडळाची वाढती लोकप्रियता ही सप्तमी संग्रहाची सप्तपदी असून ‘ प्रतिपदा ’ ते ‘ सप्तमी ’ ही सात प्रकाशनें म्हणजे आमच्या मंडळाच्या काव्यसेवेची सप्तपदीच होय. रसिकांचे व आमच्या वाङ्मयीन कृतीचे संबंध या सप्तपदीने आता दृढतर झालेले आहेत, हें का आतां वेगळें सांगायला हवें ?

**कवित्रय मंडळ कार्यालय**
नरसिंह दरबार सोलापूर.

**भ. वा. अघोर**
१७–३–६१



## सप्तमी

सप्त वर्षें वाङ्मयाची
साधना हो चालली
'सप्तमी' ही अुगवली
विविध प्रांतींच्या कवींचें
जाहलें संमेलन
तुष्टवाया जनमन ॥

कवि भ. वा. अघोर

## सवाल ?

सारें सारें त्रैलोक्य पहा
देवा ! तुम्हीच निर्माण केलें
कोणी नव्हतें तुमच्या आधी
नाहीत तुम्हांस बापआअी
मग तुम्ही कसे निर्माण झाला ?
या साऱ्या जगताचें
स्थावर जंगम वस्तूंचें
साऱ्या जीवमात्रांचें
जनकत्व देवा ! तुमच्याचकडे
असें असतां देवा तुमची–
लक्ष्मी पत्नी सांगा कशी ?

# असें कसें देवा तुम्ही ?

आजी नाही, बाप नाही
कोण तुम्हाला सांभाळणार ?
बहीण नाही देवा ! तुम्हा
कोण तुम्हाला ओवाळणार ?
आजी नाही देवा ! तुम्हा
कोण सुंदर गोष्ट सांगणार ?
मित्र नाही देवा ! तुम्हा
कोण तुमच्याबरोबर खेळणार ?
दादा नाही देवा ! तुम्हा
गणित चुकलें, कोण सांगणार ?
गुरुजी नाहीत देवा ! तुम्हा
कोण तुम्हाला शिकविणार ?
कोण तुम्हाला पास करणार ?
असें कसें देवा ! तुम्ही ?
कुणीच तुम्हाला कसें नाही ?
मी तरी काय करूं ?
मलाहि कांही समजत नाहीं !

IIII IIII

# जगाच्या पाठीवर

“ करारे हाकारा
पिटारे डांगोरा
नगरांत कोणी अुपाशी-

आहे काय ? शोध करा "
अन्न नाही, वस्त्र नाही
मतामतांचा गलबला आहे
बेकारीची वाढती कळ–
पोटांत धुमसून राहिली आहे
स्वातंत्र्याचें अेकच फक्त
गळ्यांत ज्याच्या लेणें आहे
असा भारत; या जगाच्या
पाठीवरती अुभा आहे !

॥॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

## गिऱ्हाअिकांना खूष खबर

मी व्यापारी । हें दुकान माझें भारी ॥धृ.॥
वस्तू अगदी नव्या निराळ्या
हव्या तुम्हां ज्या वेगवेगळ्या
दुकानांत असती त्या सगळ्या
मम ललकारी । हें दुकान माझें भारी ॥१॥
तुमच्या अडचणि सर्व जाणतों
तुम्हां हवें त्यापरि मी देतों
गिऱ्हाअिकांची सोय पाहतों
ही मम थोरी । हें दुकान माझें भारी ॥२॥
तुम्हां हवें तर अुधार देतों
फुकट हवें तर फुकट वाटितों
रोकड, तर मी रोख पुरवितों
रीतच न्यारी । हें दुकान माझें भारी ॥३॥

नियम मात्र मम असतो अेक
" अुद्या फुकट नी काल अुधार
फक्त रोख तें आजच मात्र "
लावा बारी । हें दुकान माझें भारी ॥४॥

॥॥ ॥॥

## गौडबंगाल

तुझ्या प्रेरणेवाचून देवा;
पानसुद्धा हालत नाही
असा अगदी सिद्धान्त आहे
आणि तो सर्वमान्यहि आहे
यांतच देवा; तुझें सारें
गौडबंगाल दडलें आहे
म्हणूनच जग अजूनहि
तुझें स्तोत्र गात आहे
'अ' ने केला खून 'ब' चा
'अ' ला तूंच प्ररणा दिलीस
'अ' यांत निर्दोष हवा
त्याला पापी ठरविलेस तूंच
'ब' चा खून झाला; कारण-
'ब' चें कर्मच तसें म्हणून !
पण 'ब' ला तसें करावयास
देवा; तूंच भाग पाडलेस !
पुढल्या जन्मीं पुन्हा पहा
'ब' करतो खून 'अ' चा
रहाटगाडगें असें सारखें
देवा; तूंच फिरवीत असतोस
दाणा टाकून कोंबडयांना तूं
तमाशा मात्र पहात बसतोस !
तुझें कर्तृत्त्व होतें; पण-
लोकांचें भोक्तृत्त्व तयार होतें
अस्सल कारस्थानी देवा;
तूंच मात्र अेकटा अससी
करतोस असलें कारस्थान
म्हणूनच टिकलें तुझें स्थान
कळतां तुझें गौडबंगाल
कंगालसुद्धा विचारणार नाही
झाकली मूठ देवा; तुझी
अुघडी कधी पडणार नाही!

॥॥ ॥॥

# बारा वाजलें !

संपन्नतेच्या कळसावरचा–
भारत; व्रतांत गुंग होता
जो तो देश; त्याच्याकडे–
येऊन त्याला विचारीत होता
" कसला 'वसा' वसतोस बाबा ?
आम्हाला तरी सांग कांही ! "
" तुला रे, वसा कशाला ?
उतशील मातशील
घेतला वसा टाकून देशील "
" उतत नाही, मातत नाही
घेतला वसा टाकत नाही "
मग त्याने वसा सांगितला
चित्तभावें त्यांनी ऐकला
ज्याने ज्याने वसा ऐकला
तो तो देश संपन्न झाला
पण... याच्यातच–
भारताच्या पुण्याईचें–
बारा; अगदी बारा वाजलें !
बारा अगदी बारा वाजलें !!

॥॥ ॥॥

# कुंडली तरी तपासून घे !

दृश्य अदृश्य सारें कांही
सजीव निर्जीव सारे प्राणी
सारें त्रैलोक्य देवा; पहा
तूंच यांना निर्माण केलेंस
हें सारें तुझेंच आहे
तुझीच मालकी साऱ्यांवरती
मी आणि माझें मन–
बुद्धी, विकार, तुझेच आहेत
देण्यासाठीं तुला कांही
माझें मजजवळ काय आहे ?
तुझेंच तुला देण्यामधे
माझें मीपण कोठे आहे ?
मी तुला कांही द्यावें
असें तुला वाटणें; यांत–
देवा ! तुझी विकृति आहे
तुझें दैव फिरलें आहे
कुंडली तरी तपासून घे !
कुंडली तरी
तपासून घे !!

॥॥ ॥॥

## कळतें; पण !

सुखामागे जग लागतें
पण सुख कांही मिळत नाही
मिळत नाही; म्हणून कांही
यत्न कोणी सोडीत नाही.
सुखासाठी यत्न केले
सुख तरीहि मिळत नाही
हा सिद्धान्त कळतो; पण–
सुखाचा नाद सुटत नाही.
सर्व सौख्याचें निधान
श्रीहरी जो भगवान
प्रयत्न करतां त्याच्यासाठी
प्रगटेल प्रत्यक्ष वनमाळी
फिटतील आपलें सारें पांग
सुखाची लागेल पहा रांग
हें सारें कळतें; पण...
त्याला कोणी विचारीत नाही
तोही बसला तसाच तिकडे
त्याला कोणी गिऱ्हाअिक नाही
आपणहि हिंडतो अिकडे असेंच
आपणांस दाता भेटत नाही.

|||| ||||

# देव दैवां दोष कां ?

ज्याचें दैव झोपलें आहे
त्याला देव झोपला आहे
ज्याचें दैव जागें आहे
त्याला देवहि जागा आहे.
जसें ज्याचें दैव आहे
तसा त्याला देव आहे
तो कुणाचा बांधला नाही
त्यानेंहि कुणाला बांधलें नाही.
स्वत:चें स्वत:लाच
ज्याने त्याने बांधून घेतलें
घडत जातें दैव तसेंच
मग देव दैवां दोष कां ?
दैव घडविणें आपल्या हातीं
दैवाला मग दोष कां ?
जसें दैव; तसा देव
देवाला मग श्राप कां ?
बरें वाईट अेकाद्याचें–
करणें; देवा अशक्य होय
हेंवे दावे मानव करतो
हेंच त्याचें अज्ञान होय
विज्ञान पुढे सरकत चाललें
अज्ञान मागे रुजत चाललें.

–भ. वा. अघोर, सोलापूर.

# " मृगजळ "

झळझळ झळझळ झळझळ तें, मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।धृ.।

श्रीमंतीचा थाट आगळा
हवाहवासा सौख्य सोहळा
लागतां परी तियेच्या गळां
तळमळ तळमळ तळमळ रे, तें मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।।१।।

कीर्ती शिखरी कुणी पाहुनी
झेपावतची पंख लावुनी
शिखर न दिसतां उरीं फुटूनी
हळहळ हळहळ हळहळ रे, तें मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।।२।।

नार कुणीशी स्वरुप सुंदरा
मनास भुलवी करुनी नखरा
कळकट अंतर बघूनी नरा
मळमळ मळमळ मळमळ रे, तें मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।।३।।

तारुण्याची मस्ती जहरी
आग लावते नित्य अंतरीं
भोग भोगुनी तृप्ति ना खरी
खळबळ खळबळ खळबळ रे, तें मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।।४।।

वणवण भटके जगीं आंधळा
पोटासाठी धावतो खुळा
जिजीविषेचा करी खुळखुळा
खळखळ खळखळ खळखळ रे, तें मृगजळ मृगजळ मृगजळ रे ।।५।।

—नारायण पंढरीनाथ जगदाळे
साहित्यप्राज्ञ, टी. डी. सी. पी. एड्., तडवळे

म. ३८८९८ दि: २०/७४
१९.... नों दि: २०/७/७४

सौ. कुंता जगदाळे

# " आठवण "

( अेक छोटा बालक परगावीं गेला असतां मातृहृदयाचें झालेलें आविष्कारण )

उगवतां नारायण येतीं बालकें दारांत
" बाई, उठला का संजू ?" विचारती तीं हासत ॥१॥
काम करतां करतां अडखळतात हात
येते तुझी रे चाहूल भास मनांत होतात ॥२॥
दूध उतरतां खालीं म्हणे, "आई देना साय"
आज आली साय जाड नाही खावया संजय ॥३॥
थांबे पाववाला दारीं म्हणे, "छोकऱ्या ये लेना"
'हिऱ्या' भाकरी खाईना कुठे संजय दिसेना ॥४॥
खेळण्यास वाळूमध्यें जमलींत बालकें हीं
नाहीस तूं त्यांत तेवी हेलावतें मन बाई
म्हणे, "आईच आवडे" लावूनिया गालीं गाल
कर घालुनी गळयांत बिलगतो लडीवाळ ॥६॥
"नको बोलूं मजसंगे" म्हणतांच रागावून
"असं काय बरं आई ? संजू तुझाच आहे नं ? ॥७॥
जेवणार नाहीं बघ आई कर ना गं भात
घास घाल तूंच आता दमलेत माझे हात" ॥८॥
कधी नेत्रीं आसवांची बघुनिया झाली दाटी
म्हणे, "काय रडायाचें ? हास आई संजूसाठीं" ॥९॥
फिरावयास जातांना म्हणे, "फुलें दे तोडून"
फुलवेडा नाही संगे जातीं झाडें उदासून! ।१०।

–सौ कुंता जगदाळे बी. अे. बी. टी. तडवळे



## ★ वाटचाल ★

(जाति मोहिनी, राग जोगी)

वाटचाल कधि रे आतां
संपणार देवा ! ।।धृ.।।
चाल चालुनीया दमले
पाय फार माझे

इतर काय घेऊं,
माझें मला होय ओझें !
उचलवें न पाउल तरिही
मिळेना विसावा ।।१।।

झाडझुडप एकादेंही दिसेना कुठेही
माळ फत्तराचा, पाणी अश्रुवीण नाही
तुला तरी पाझर मग कां या इथे फुटावा? ।।२।।

गोड निरोपाचे मोठे शब्द जिवलगांचे
कान भरुनि ऐकुनि केले सोबती पथीचे
टाकुनिया गेले न कळे कसे आणि केव्हां ! ।।३।।

कोठवरी चालुनिया मी येथवरी येई
किती पुढे चालायाचें कल्पनाहि नाहीं
मरण सोडविल हा तरि का भरवसा धरावा ! ।।४।।

(कोल्हापूर साहित्य संमेलन वृत्तान्तांत प्रसिद्ध झालेली व त्या संमेलनात स्वत: कवीने गाऊन दाखविलेली कविता)

# ... रसिकास ...

(जाति भूपतिवैभव, राग मांड)

हीं गीतें केवळ रसिका रे ! तुजसाठी
सोडून अरसिकां; तुझ्या लागलों पाठी

गुंफिला हार हा तुला शब्दसुमनांचा
रसहीनां अर्पुनि नाहीं सुकवायाचा

जरि भीड ओढिते मागें; रोधी गतिला
धावतां चुकवितों तिला अडविणारीला

अवधान तुझें; मज असें लाख मोलाचें
मज नकोचि नाटक मान डुलविणारांचें

तूं नकोस काढूं शब्द एकही स्तुतिचा
आंसवें अुभीं तव ठाव द्यावया मनिचा

करपवील नीरस माया जेव्हां मजला
हीं तुझीं आंसवें येतिल अुपयोगाला

रागाव अुगारहि तूं टीकेची काठी
सोडून अरसिकां, तुझ्या लागलों पाठी

( ग्वाल्हेर साहित्य संमेलन वृतान्तांत प्रसिद्ध झालेली व पुणें आकाशवाणी केंद्रावर दि. ९-११-६० रोजीं कवीने स्वतः गाऊन दाखविलेली कविता )

—महादेव भिमाजी कुलकर्णी, पुणें

# जगाचा न्याय

( कविश्रेष्ठ काव्यविहारी यांची 'जगाचा न्याय' ही कविता वाचून )

हा न्याय दिसे या जगतीं ।।धृ.।।
दिसतांक्षणिं नाग विषारी
मारी वरि गरुड भरारी
नकुलाची त्या वरि स्वारी
परि खुशाल फिरती गोगलगाई । कोणि न त्या दुखवीती ।।१।।
पडतांच गर्जना श्रवणीं
किति गर्भगळित होवोनी
स्वप्राणा त्यजिती प्राणी
त्या सिंहांनाहि मानव, मतिने । थर थर थर कांपविती ।।२।।
अधिकारी जुलमी असतां
'वॉरंट' यमाचें येतां
चालेना त्यावरि सत्ता
तेधवा तयाला कृतकर्में तीं । ढळ ढळ ढळ रडवीती ।।३।।
कर्तव्यच्युत जे झाले
ते नोकर कोणी असले
जळफळती त्यावरि सगळे
त्यासही होतसे सजा परंतु । सकलां कळते ना ती ।।४।।
देवुनी कामधंद्यासी
जो सहस्रजीवां पोशी
तो दिसला जरि गुलहौशी
परि मिजास त्याची तुच्छ खरोखर। गिरणी मजुरापुढती ।।५।।

त्या प्रजाहितांच्या गोष्टी
तैशा त्या संस्था दिसती
धर्मार्थ निधीही जमती
हीं सगळीं कृत्यें धनवंतांच्या । केवळ जीवावरती ॥६॥
जरि बलिष्ट ते तोऱ्याने
मिरविती सदा गर्वाने
गांजिती प्रजा स्वार्थाने
परि शेरालाही सवाशेर हा । निर्मितसे विधि जगतीं ॥७॥

॥॥ ॥॥

# शकुंतला लग्न नव्हें बरें हें

शकुंतले ! आश्रमिं एकलीच । बघोनि दुष्यंत शिरे तसाच
तिथे तुला बद्ध करी विवाहें । शकुंतला लग्न नव्हें बरें हें ॥१॥
तूझ्यावरी प्रीति तुझ्या पित्याची । नको मुली !
सम्मति काय त्याची ?
जरी तयां तूं वरिलेस मोहें । शकुंतला लग्न नव्हें बरें हें ॥२॥
जरी कुणी यौवनयुक्त वीर । कुमारिला मोहिनि घालि फार
परी जरी तें वडिलां न साहे । शकुंतला लग्न नव्हें बरें हें ॥३॥
जरी असे प्रौढविवाह श्रेष्ठ । तशांत स्वातंत्र्य असें वरिष्ठ
सकामता गुप्त कदापि नोहे । शकुंतला लग्न नव्हें बरें हें ॥५॥
न माय तूतें शुभ इच्छिण्यास । म्हणोनि कीं हा पथ शोधिलास ?
अधीरता ही परि इष्ट नोहे । शकुंतला लग्न नव्हें बरें हें ॥५॥

—विष्णुसुत अंब्रजकर तथा
रामचंद्र विष्णु कुलकर्णी, कऱ्हाड



# नरहरी

दुड्दुडु धावत नीरा आली
भीमरथीच्या कुशींत दडली ।धृ.।

सुरम्य संगम भीमा–नीरा
त्रस्त जिवाला जिथे आसरा
सर्व विसरतो जीव–पसारा
विश्व शांतता इथे गुंतली ॥१॥

हिरण्यकशपू वधिल्या कालां
शांत नरहरी इथे जाहला
जिव्हेने सद्‌भक्त चाटला
वीरासनिं मग मूर्ती नटली ॥२॥

विचुरकरकृत भव्य मंदिरीं
क्रोध शमअुनी नटे श्रीहरी
भक्त जनांचें दुःख निवारी
वारि निराशा; करी सावली ॥३॥


भीमा नीरा तटीं निवासी
विश्वचालका विनंति अैसी
सौख्य लाभु दे या विश्वासी
"कमलात्मज" विनवितो माअुली ॥४॥

# ओळखा ?

रामभक्त अन् कृष्णसासरा
दुर्दैवी मी, कंठि कासरा
महामल्ल मी जोड नसे मज
दरवेषाचा बनलों अैवज (अस्वल)

–'कमलात्मज', मेघश्याम नरहर जोशी, कोरवली

# स्वप्नखुळा अशान्त मी–



हळूवार नखाची जी
कैफ लावताहे आग
तुझी खूण जपतांना
स्वप्नखुळा अशान्त मी

आहे हातावर खूण
काठावर ओठंगून
वेडीपिशी अशी रात
असा अुभा वादळांत

# सांजवेळ–

मी तों अुधाण सागर
आज तशांत सापडे

आणि तूंही अवखळ
अेकटीही सांजवेळ

# आतां–

आज पहिली नव्हाळी
लाट फेसाळावी आतां

तुझ्या सुकुमार ओठीं
गळा बुडण्यांपुरती

# जातांना आर्द्र हवा–

जातांना आर्द्र हवा
अन् निरोप वेळेला

ओठ तुझा थरथरता
पदर तुझा फडफडता

# कुणी डोकावावें–

कशा कुणी डोकावावें
कशा मींहि जागवाव्या

माझ्या अुध्वस्त जीवनीं
अुगा जुन्या आठवणी !

–रमाकांत आर्ते, जामनगर

# मानव आणि फूल

मानवः—सुखदुःखाच्या घटिका गेल्या
अमलत्या फुला; तुझ्या जीवनीं
प्रफुल्ल अंतरमनांत काटे—
बोचत होते तुझ्या जीवनीं ॥१॥

मधु लुब्ध भ्रमरांचें गुंजन चालत होतें तुझ्या मीलनीं
मधूर हास्यें मधुर मधाचे मधुकर मधुकरि घोट पिऊनी ॥२॥

युगूल गेलें स्वच्छंदाने निर्मधु निष्प्रभ तुला करोनी
हासत विकसत तसा राहसी राग नाहि का अंतःकरणीं ? ॥३॥

अमृतकुंभा रिक्त करीती काळकूट कीं हें हृदयाचें
अेक दुजाला सांगुन वेड्या शिंग फुंकना रे जागृतिचें ? ॥४॥

फूलः—स्वार्थि मानवा सांगु नको मज
सार्थक हेंचीं मम जन्माचें
दुःख गिळूनी आनंदाने
द्यावा रस हें ब्रीद आमुचें ॥५॥

तरू लतांना शोभवून मग सुखवावें कीं जन—नयनाला
सुरभी सौंदर्याने सजवी भगवंताच्या नित पूजेला ॥६॥

अल्प जीवनीं लघू सुधेने
सुखवी प्राणीमात्रालाही
क्षुद्र फूल मी, सूज्ञ मानवा !
बाकि न अुत्तर देण्यालाही

—सौ. कमलाबाई सोहनी, मुंबई

# हृदयीं वसंत मम फुलणार !

पुनीत अवघें गंगाजल हें
अवकाशीं भरभरुनि राहिलें
ताऱ्यांच्या डोळयांतुनि हसरें–
बिंब तुझें बघणार–

सौंदर्याचे चंदेरी कण
झरती पानांफुलांफुलांतुन
तहानलेला चातक होउन
अखंड मी टिपणार–

फुलते चंद्राच्या उद्यानीं
माझी अरविंदा मधुस्वप्नीं
शाम भ्रमर मी तिथे जाउनी
गुंजारव करणार–

॥॥ ॥॥

# बाहूंच्या पाकळयांत–

पर्वतश्रेणी निळसर
वनराजी निळसर ही
चपल चाल चरणांची
तनुवरती विसावली
सांज आतां काजळली
गंध तुझा तरंगता
...भृंग तमाचा फसतो
गुदमरु दे गे मजला

निळसर हें नभमंडल
लोचनांत भाव नील
नयनांची चंचलता
मदनाची प्रसन्नता
अंधुकशी वाट विरे
आस अुगा (?) मनीं झुरे !
दश दिशिच्या अुत्पलांत
बाहूंच्या पाकळयांत

**वासुदेव नरहर सरदेसाई, सुरत**

**पांडुरंग नारायण कुलकर्णी** यांचा जन्म १९१५ मध्यें झाला. लहानपणापासून यांना गाण्याची फार आवड असल्याने लहानपणापासूनच त्यांचें ठिकठिकाणीं गाण्याचे कार्यक्रम सुरू झाले. पुढे भावगीत गायक म्हणून ते प्रसिद्ध झाले. या भावगीत गायनांतूनच स्वतंत्र भावगीतें रचण्याची त्यांना स्फूर्ती झाली. 'गायक' या भूमिकेंतून 'कवि' या भूमिकेवर त्यांनी पदार्पण केलें. गायक व कवि अशा दुहेरी भूमिकेचा त्यांच्या ठिकाणीं सुंदर संगम आहे. साहित्य संमेलनांतून, गणेशोत्सवांतून व विविध अुत्सव प्रसंगांतून त्यांचीं प्रभावी काव्यगायनें होतात. सोलापूर येथील 'सोलापूर मिल' मध्यें ते 'क्लार्क' आहेत. 'विठ्ठल प्रदक्षिणा' हें त्यांचें काव्यपुष्प प्रसिद्ध झालें असून 'भावमंजिऱ्या' या हस्तलिखित संग्रहाचें प्रकाशन झालें आहे.

# विठ्ठल माझा नव्हता तान्हा

कौसल्येचा राघव जाणा
    कृष्ण, देवकीनंदन; तान्हा
        माय लाभली ह्या देवांना
            थोर जाहले, पिअुनी पान्हा ॥१॥

विठ्ठल माझा नव्हता तान्हा
    माया ममता केली कुणि ना
        असा देव मम आओविन हा
            भक्तांसाठी अुभा नित पहा ॥
    पंढरीस हा पंढरिराणा
            मिठी मारुं या त्याच्या चरणां ।.

**—पांडुरंग नारायण कुलकर्णी, सोलापूर.**

# ओढ !

मम स्वप्नीं येशी । आणि कां माझ्यावर रुसशी ? ॥धृ.॥

मनसिंहासन त्वदीय आसन
त्या वरती तूं विराजशी पण
अुगाच करिशी मजला शासन
हृदया कवटाळिशी । आणि कां माझ्यावर रुसशी ? ॥१॥

अुजाड होतें माझें जीवन
धांव घेत तूं येथे येअुन
बनविलेंस त्याचें नंदनवन
अुपकारी होशी । आणि कां माझ्यावर रुसशी ? ॥२॥

ताऱ्यावाचुन हें गगनांगण
दिसेल जैसें भयाण भीषण
तसेंच माझें सारें जीवन
अुजाड तूं करिशी ॥३॥

मधुर सुगंधी प्रेमळ सद्‌गुण
हेंच तुझें सुंदरसें भूषण
जीव तळमळे तुझिया वाचुन
जादुगिरी करिशी । आणि कां माझ्यावर रुसशी ? ॥४॥

—सदानंद राम शिरोडकर, मातोंडबांबर

अनुक्रम ... क्रमांक ...

# गुढी पाडवा

वर्षाचा दिन अगदी पहिला
आनंदाने करूं साजरा
वर्ष सुखाचें जावें म्हणुनी
परमेशाला करुं या मुजरा ॥१॥
अुंच मनाची गुढी अुभारा
सत्‌भावाचा घाला शेला
प्रेमाचें तें बंधन त्याला
भाव–शर्करा–गाठी घाला ॥२॥
शत्रुभाव तो दूर घालवा
मैत्री फुलवा, लोभ वाढवा
मोद दाटला दाहि दिशेला
असाच यावा गुढी पाडवा ॥३॥

॥॥ ॥॥

# वसंत आला

येअि फुलोरा अमराअीला
दिनकर तळपे नभोमंडळा
धरतीं डोले अल्लड वारा
मंजुळ गीतें गात कोकिळा
ये शाखंबरि ! फुलवी शाखा
जाअुनि भिडतिल दिगंतराला
वृक्ष–लतांना नवी पालवी
चाहुल लागे, वसंत आला

**–लक्ष्मीकुमार**

**प्रभाकर भगवंत येळेगावकर, सोलापूर.**



**चतुर्भुज तुकाराम पाटील पांगारकर** यांचा जन्म १९३६ सालीं झाला. मराठी ७ व्या अियत्तेपर्यंत त्यांचें शिक्षण झालें असून त्यांचा व्यवसाय शेती हा आहे. शेतीच्या अुद्योगांत रमूनहि त्यांना वाङमयाची आवड असल्याने ते कविता करतात, लेख लिहितात. 'नको रंडीबाजी' हे नाटकहि त्यांनी लिहिलेलें आहे.

## गण स्तुति

शुभमंगल समयीं गण रंगला
रंगला शिवसुत
पाहुं गौरिनाथ
अती शोभला ॥धृ.॥

शास्त्र अंतरीं गण हा पहिला
वंदन पहिलें गजाननाला
फिरले साऱ्या त्रैलोक्यांतुन
ज्येष्ठ श्रेष्ठ हा त्याचा मान
रंग अुधळितां वाजे हलगी
गड गड गड गडड
सुर नाद गुंगला ॥१॥

गणाधिशाची गर्जलि वर्दी
सभामंडपीं जमली गर्दी
मानाची ही त्याला गादी
नटीनटांच्या श्रोते नादी
परंतु चाळ पायीं ध्वनि गाई
झुनु झुनु झुनु झुनुनु
अुदिर पहा नटला ॥२॥
धावत ये वर दे मज आतां
राग छत्तिसहि तुझ्याच हातां
विनंति तुजला गौरीनाथा
करुनि आरती चरणीं माथा
प्रसन्न होतां झांज निनादे
झन् झन् झन् झनन
अेकच नाद दाटला ॥३॥
पाहि गणवरा; तुझ्या सेवका
गाव पांगरीं पिटितो डंका
नांव 'चतुर्भुज' कवि हा पत्ता
जांब नदीवर गण हा गातां
सुखकर्ता तूं लक्ष्मीदाता
खन् खन् खन् खनन
कल्पवृक्ष तूं जगताला ॥४॥

॥॥ ॥॥

## ★ प्रीती ★

प्रीती करशील का ? करशील का ॥धृ.॥
तुझी नि माझी सख्या रे जोडी
प्रेमाने चालवु पाण्यांत होडी
होडीच्या त्या वल्हवां
हाती घेशिल का ? घेशिल का ? ॥१॥

प्रात:काळीं गाइ कोकिळा
आठवण तुझी होअि रे मला
आठवणीच्या निद्रास्थानीं
भेट तूं देशिल का ?
देशिल का ? ॥२॥

कवि " चतुर्भुज " वाजवि बासरी
मधुस्वरांच्या गुंफी लहरी
लहरीचा मंजुळ सुस्वर ध्वनि
कानीं घेशिल का ?
घेशिल का ? ॥३॥

॥॥ ॥॥

## 卐 श्रीकृष्ण विनवणी 卐

वाजवि मुरली झोकात नाचतो
आम्हा गोपींचि मस्करि करतो
ग बाअि करतो ॥धृ.॥

सुगंध चंदन लाविलें भालीं
मुकुटीं हिरे रत्नें मढविली
मयुरपंख शिरीं हा खोवतो
आम्हा गोपींचि मस्करि करतो ॥१॥

गळां घालुनी वैजयंतिमाला
काजळ भरिलें नयनीं गालां
रूप सावळें पीतांबर कसतो
आम्हा गोपींचि मस्करि करतो ॥२॥

पायीं पैंजण रुणझुनु करी
मनीं ध्यानीं गं स्वप्नांत हरी
वेणि दाढिची गाठ बांधतो
आम्हा गोपींचि मस्करि करतो ।।३।।
हरिबाबाने स्थापीलि गादी
या भेटोनि काढा संधी
कवि "चतुर्भुज" अखंड रमतो
आम्हा गोपींचि मस्करि करतो ।।४।।
।।।। ।।।।

# महात्मा

देशभक्ता जरा तरी ऐकना
कसा सोडुन गेला भारताला ।।धृ.।।
सन सत्तेचाळिस सालांत
पंधरा ऑगष्ट या महिन्यांत
भारत स्वतंत्र झाला ।।१।।
जातिभेद तूं नष्ट करविला
सुमार्ग जगतां तूं दाखविला
जयहिंद शब्द गर्जला ।।२।।
सत्य अहिंसा व्रत मनि धरुनी
कितीक वेळां शिक्षा भोगुनी
गोरा पळवीला ।।३।।
'चतुर्भूज' हा रणीं रंगला
वंदन करतों राष्ट्रध्वजाला
देवरूपी गांधी हरपला ।।४।।

—चतुर्भुज तुकाराम पाटील, पांगारकर पांगरी

**बजरंग शामराव सरोदे**



जन्म १९३५. रोंदळा येथे अध्यापक. विपुल काव्यलेखन. कलिका' काव्यसंग्रहाचे संपादक ागपूर नभोवाणीवरून यांच्या ाव्यांचें ध्वनिक्षेपण होत असतें. ालापत्रक, आनंद, मुलांचें ासिक, बालसन्मित्र, किरण, ोकसत्ता, लोकसेवा, अनुराधा, क्षत्र, कर्तव्य, मातृभूमि, मॉल सेव्हर, सांजवात, भाव-ीणा, पालवी, कोरीवलेणीं वगैरेंतून यांचें साहित्य प्रसिद्ध आहे.

## तुझ्याविण

तुझ्याविण सखे
प्रासाद हा शून्य
भासे सर्व रान
आज मला ॥१॥

तुझ्याविण सखे
सारे व्यर्थ जाण
हृदयांत प्राण
असूनिया ॥२॥

तुझ्याविण सखे
अरसिक जिणं
रुक्ष सारे क्षण
जगतों मी ॥३॥

# ना फूल, ना कळी

तुझ्या वियोगाने
व्यथित मानस
उगीच मनाला
बेड लाविलेंस

सांडलेल्या स्मृती
वेचीत बैसणें
भरल्या डोळ्यांनी
रोज न्याहाळणे

प्रेमाच्या पाकळ्या
...भावनाच खुळी
जुळतां न जुळे
ना फूल, ना, कळी !

॥॥ ॥॥

# न्याय !

प्रीतीचीं सुमनें
आम्हीं फुलवावीं
कुणी तरी घ्यावी
गोडी त्याची ॥१॥

दुःखाचे डोंगर
आम्हीं उलथावे
कुणी तरी घ्यावें
साधोनिया ॥२॥

जगाचा हा न्याय
असे अुफराटा
सदा चालायाचा
रात्रंदिन ॥३॥

## अडलें पाणी

अडलें पाणी सुटला वारा
त्यांत ओतला विषय निखारा
विषय निखारा धुंद बावरा
जाळित सुटला स्वदेह सारा !
डोंबच उठला आसक्तीचा
आवरताही अवरेना तो
कलह पेटला असा सर्वही
साथ तयाला जो तो करितो !
अडलें पाणी नुरलें जीवन
जीवन म्हणती, म्हणुनी जीवन !!

।।।।   ।।।।

## श्वास

श्वास माझे रोखले नेत्र-नेत्रीं भेटले
लाजणाऱ्या व्यथांना आज तृप्ती घेऊ दे !
नव्हाळी दो जिवाची आज पूर्ण फेडूं दे !!
...श्वास माझे रोखले गात्र सारें धुंदलें
स्पर्श आहे जागृतीं ...चाखणारे चाखती
ओठांवर......नयनांवर ते शब्द मुके बोलती
वेडलेली स्तब्धता
श्वास नाही मोजत
चेतनेची........
परि जाणीव-जाणते !

—बजरंग सरोदे, रौंदळा

**मनोहर बर्वे** यांचा जन्म १९३४ मध्यें झाला असून शालेय शिक्षण धारवाड येथे झालें. सोलापूर येथील डि. अे. व्ही. कॉलेजमधून ते अिंटर अुत्तीर्ण झाले. वृत्तपत्रें, मासिकें प्रातिनिधिक काव्यसंग्रह यांतून त्यांचें काव्य प्रसिद्ध आहे.

# आठवते ना तुजला ?

आठवते ना तुजला
ती सकाळ...तो ताजवा
वाळू वाळू...तुडविला–
तो किनारा...तो गारवा
आठवते ना तुजला
ती दुपार...तें भेटणें
त्या शपथा...तीं वचनें
भर दिवसा चांदणें.
आठवते ना तुजला
ती रात्र...तें बहकणें
उमलल्या जाणीवेंत
ते फुलणें...मुक्तपणें

॥॥ ॥॥

# ऋतुराजा

ऋतुराजा हा वसंत
आला उल्हास घेऊन
घराराणीचा आनंद
राहिला दिशा भरून ।।

चराचरांत आगळी
नवाई ये मोहरून
आंबेवनांतून गोड
कोकिळकुहूची धून ।।

रंगदंग आभाळाचें–
मौन सरलें क्षणांत
वारा गुणगुणे कांहीं
गंधवतीच्या कानांत ।।

तरू तरूंवर धुंद
पालवे हळवा स्पर्श
सुखसोहळयांत अशा
दुःखहि हासें सहर्ष ।।

–मनोहर बर्वे, पुणें



**विष्णु बाबूराव तानवडे गुरुजी** यांनी 'सुविचार मौक्तिक माला' हें पुस्तक लिहिलें असून ना. काकासाहेब गाडगीळ, म. म. पोतदार यांनी अुत्कृष्ट अभिप्राय दिले आहेत. हे हिंदुधर्माभिमानी, संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते व सामाजिक कार्यकर्ते आहेत.

## ओवाळूं राजेन्द्रांना

मंगल अजि सुदिना । ओवाळूं राजेन्द्रांना ।।धृ.।।
देशाच्या अध्यक्षांना । क्रांतीच्या वीरांना ।।
राष्ट्राच्या शूरांना । नमन करूं त्यांना ।।१।।
पंढरपूर साचें । घटक भारताचें ।।
ठिकाण पावित्र्याचें । पंढरीनाथाचें ।।
उल्हास सर्वांना । नमन बाबूजींना ।।२।।
बाबूजी येथे आले । चालक आनंदलें ।।
विनोबा संतोषले । जय जयहिंद बोलें ।।
वंदन करूं त्यांना । भारत चालकांना ।।३।।
भरतखंड हें साचें । कष्टाळू जनतेचें ।।
विकास योजनांचें । पंडित नेहरूंचें ।।
नमन करूं त्यांना । आनंद सर्वांना ।।४।।

नुक्रम ...३८८६ ( वि. ...
मांक ...५६८०


# भारत पुत्रांनो

उठा उठाना, बंधू जनहो, भारत पुत्रांनो ।
कठिण समय हा, आला जवळी, धावा सिंहांनो ।।धृ.।।
गोमांतकच्या, दुःखगर्जना कर्णीं ना पडल्या ?
कर्णीं पडतां पडतां तुमच्या हृदयीं ना ठसल्या ? ।।१।।
कुणी नव्हे, कोणाचें, अपुलें राज्य भारताचें ।
दया न येई, परक्या लोकां, गुलाम हो त्यांचे ।।२।।
गतकालाचीं, विशाल राज्यें, नयनीं ना दिसतीं ?
शूरपणांचे, डावपेच ते, लुप्तचि हे होती ।।३।।
उठा उठाना, धैर्य धराना, शौर्य चिकाटीला ।
गोमांतकला, मुक्त कराया, प्राण पणां लावा ।।४।।
परक्रमाने, भारत घेउन, विजयाचीं चिन्हें ।
गोमांतकला कां दवडीलें, त्याचीया माने ।।५।।
शूरवीर ते, बंदि घालुनी, कारागृहिं छळिलें ।
वंद्य हुतात्मे, असंख्यांत ते, स्वर्गीं धाडियले ।।६।।
या कृत्याचा, सूड घ्यावया, करा निश्चयाला ।
सहस्रावधी, नरराक्षस ते, यमसदनीं धाडा ।।७।।
ऑगष्ट पंध्रा, सत्याग्रहचा, दिवस असे झाला ।
गोमांतकची, बेडि तोडण्यां, योग पहा आला ।।८।।
चला उठा हो भारतवासी, करा तयारीला ।
रणशूरांचें, नांव घेऊनी, 'जयभारत' बोला ।।९।।

—विष्णुपंत बाबूराव तानवडे
कुरोली-सिद्धेश्वर



## सीताराम रा. बोरशे

जन्म १९०८. प्राथमिक शिक्षक. साप्ताहिकांतून व मासिकांतून विपुल साहित्य प्रसिद्ध. म. गांधी निबंध लेखन स्पर्धेत महाराष्ट्रांत पहिल्या क्रमांकाचें ५० रु. चें बक्षीस यांना मिळालें. वर्धा शिक्षण योजनेला पोषक व सरकारी योजनांना अनुसरून यांनी 'पितृ गौरव ग्रंथमाला' चालविली असून आत्तापर्यंत २१ पुस्तकें स्वत: लिहून स्वत: प्रकाशित केलीं आहेत.

# तरसोदचा गणपति–

( असोदें गावापासून दोन मैलांवर तरसोद गाव वसलेलें आहे. तेथे मुलांची सहल गेली असतांना– )

दिसाया असें गाव तरसोद छोटें पिकांचे, फळांचे मळे मात्र मोठे
जयांच्या शिरी छत्र गौरी–सुताचें
तया सज्जनांच्या पदीं सौख्य नाचें ।।
असे मंदिरीं विघ्नहारी गणेश। दिसे बाजुला चर्मधारी महेश।
पुढे सज्ज नंदी करायास सेवा। तसा नाग येथे कुणाचा न हेवा
विहीरींतलें प्राशुनी गोड पाणी। मनीं तोषती तापसी या ठिकाणीं
असे चौथरा भोंवतालीं बसाया। भले वृक्ष मोठे ! पडे गर्द छाया

भरे सोहळा कार्तिकी–पौर्णिमेला। जमे दर्शनाला तयीं भक्तमेळा
कुणी पारणें फेडण्यां थांबतात। कुणी वंदुनी स्वगृहां लोटतात।
अहिल्या सती अेक राणी महान। तिनें बांधिलें रम्य मंदीर सान
मुदें बालगोपाळ दौऱ्यास येती। गणेशास भावें स्तवीती, नमीती

## मित्राची निवड

प्रचंड अैसी रणवीर सेना। साह्यास घ्यायास मना गमेना॥
अचूक घेई निवडूनि कृष्ण।
अर्जून साधी निजकार्य पूर्ण ॥ १ ॥
बाजीप्रभू हा लढला रणांत
दावीयले दोन शिवास हात
'करील हा साह्य स्वराज्य–काजीं'
जाणूनि त्याला वळवी शिवाजी ॥ २ ॥
संभाजिने त्या कलुषा द्विजाला
हस्तीं धरीलें म्हणुनी लयाला॥
झुंझार गेले सरदार नाना
पाही स्वयें मोंगल बंदिखाना ॥ ३ ॥
न दुःख देतां कुसुमास थोडें
भुंगा प्रमोदें सुरसास जोडे॥
करूनिया हंस विभक्त नीर
सेवोनि होतो प्रमुदीत क्षीर ॥ ४ ॥
स्वकार्य व्हाया उपयोग ज्याचा
वेंचूनि त्यातें मन, देह, वाचा॥
सन्मित्र घ्यावा निवडूनि योग्य
सीमा न त्याला उदयास भाग्य ॥ ५ ॥

**–सीताराम रा. बोरशे, जळगाव**



**रत्नाकर सीताराम बोरशे**. जन्म १९४१. सध्या ते सिनियर बी. ए. ला आहेत. साप्ताहिकांतून साहित्य प्रसिद्ध. निबंध लेखनाची आवड. काव्याचा छंद. निबंध व वक्तृत्व स्पर्धेत प्रथम श्रेणींचीं २० बक्षिसें यांनी मिळविलेलीं आहेत.

# बघण्यांत–

तुझ्या माझ्या बघण्यांत
नाही अर्थ, नाही अर्थ
खिडकीच्या भात्यांतून
नेत्रबाण व्यर्थ व्यर्थ–

येतो हासत नाचत
कधी हृदयाचा गाथा
लपे अकस्मात दूर
मान वाकवून व्यथा–

केव्हां ओठांच्या वाटींत
शब्द सारे जमताती
त्यांच्या नाजूक नादांत
स्वर लाजत लोपती.

त्यांत अंतरिचा कणा देई दिलासा मनास
पूर्णत्वाच्या काठीं परी उदास, भकास !
छायेविण प्रकाशाचा ठसा अपुर्णांच्या भाळीं
दाट वृक्षांच्या बनांत जशी एक सोनकळी !
किती सांत्वन मनाचें करूं अशा बघण्यांत ?
सर्वस्वाचा होम व्हाया उभी अंतरीची ज्योत !!

## निश्चय—

अंतरीच्या जखमांची
खपली निघो न कधी
याचसाठी नयनांना
येणाऱ्या पुराला बंदी—
नि अधरांना द्यायची
स्मित हास्याची झिलई
जळणाऱ्या भावनांना
मधु शब्दांची कल्हई—
मोकळ्या मनाची वाट
ठेवायची लपवून
दुःखाला लावून बांध
ताठ करायची मान—
आतां आहे जाणें येणें
केवळ औपचारिक
ऐकाया येणार नाही
माझ्या हृदयाची हांक—
जळणाऱ्या हुतात्म्याची
मला तालीम करूं दे
मग मनाचें पाखरूं
आंत किती पोखरूं दे !—

—**र. सी. बोरशे** सीनि. बी. ए. **जळगाव**

**दा. ह. देवतळे** अूर्फ **'श्याम'** यांचा जन्म १९३७. असून शिक्षण मॅट्रिक, ट्रेंड पी. टी. आय्. हिरवळ व सुस्वागतम् या काव्यसंग्रहांत त्यांचें काव्य प्रसिद्ध झालें असून काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. आरमोरी येथील हितकारिणी विद्यालयांत पी. टी. आय्. म्हणून ते काम करतात.

## अीशस्तवन

अुषःकालि हो अीशा स्तवु या मुदें मनोभावें
विश्वसुंदरा, परम मंगला, आम्हां पावावे ॥१॥

दीन दयाघन अखंड आम्हा लाभो सुख कीर्ती
मिळो संपदा, हरी आपदा, ध्यातों तव मूर्ती ॥२॥

सकला देअी शौर्य धैर्य अन् बुद्धी चातुर्य
स्वातंत्र्याचा ध्वज विलसो, जन तेजस्वी सूर्य ॥३॥

सुजलां सुफलां सदा फुलूं दे वसुंधरा जननी
सुविचारांचें अुपवन बहरो, अशी करी करणी ॥४॥

व्यापुन सगळे अणुरेणूही दशांगुलें अुरला
तारक, मारक, दीनोद्धारक, निर्गुण तूं ठेला ॥५॥

प्रभो अनंता ब्रह्मस्वरुपा करितों हें तुजला–
पंचप्राणें चरणां वंदन, अगाध तव लीला ॥६॥

# आओी !

आओी म्हणूंच कोणा ?
मारी अशाच हाका
आओी कुठे दिसेना
परि 'ओ' कधी मिळेना ।। १।।

दुर्दैवि बाळ दूर
पाहून ही सुसंधी
होतां कुठे दडून
तव पासुनीच गेलें
चोरून प्राण नेले
तो काळ मुळि कळेना ।।२।।

" माझें लहान बाळ
भरवूं म्हणेल घास
तुजवीण गे कुणाला
आहे गडे अुपाशी
चिंता कुण्या अुराशीं ? "
फुटणार प्रेम पान्हा ? ।।२।।

राहूं सुखें सदैव
खपलें न हें विधीला
घालून वर्मि घाव
होती मनांत आस
आम्हां करी अुदास
मिळणार काय कोणा ? ।। ३।।

होतां तुझेंच स्मरण
सोडी न जीव हेका
पाहूं कुठे तुला मी
नयनांत अश्रु येती
फिरतो तुझ्या सभोतीं
ओसाड का दिशांना ? ।।४।।

'श्याम'

—दा. ह. देवतळे, आरमोरी

**विनायक केशव देशपांडे** यांचा जन्म कुरुंदवाड येथें झाला असून तेथेंच ते मॅट्रिक झाले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतून बी. अे. होअून बेळगावला बी. अीडी. झाले. सध्यां ते मालवण येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर विमेन मध्यें असून सुमारे २५ नाटकांतून त्यांनी प्रमुख भूमिका केलेल्या आहेत. त्यांचें काव्य सकाळ, स्वराज्य, तरुणभारत, बलवंत, दीपलक्ष्मी वैनतेय, शिखर वगैरेंतून प्रसिद्ध आहे.

# आकाशाला हात फुटावे–

त्या माडांची हिरवी माया
पुळणीवरती होते बिंबित
सागर अपुल्या लाख जिभांनीं
चोखित बसतो मिटक्या मारित ॥

झिरपण चाले चंद्रकलांची
निळ्या मनाच्या काचेवरती
अन् हृदयांतिल धडकन ऐकत
मस्ती लोळे अंगावरती ॥

अन् रात्रीचा मत्त गारवा
मनांत भरतो हिरवी गोडी
अशांत अेकांतांत वावरे
लाल मनाची जुडी वावडी ॥

धीराच्या मग फुटतां लाटा
मेघांचेंही पंख तुटावे
अधीरतेला मिठी मारण्यां
आकाशाला हात फुटावे ॥

# नका पापण्यांनो हलू–

महाकवीचें का स्वप्न
उभे उभारून माथा
वाणी गोड सारंगीची
नेत्रीं संकेताची गाथा ।।

कवि–कल्पनेचें रूप
मत्त चाल मल्हाराची
अंगी लपेटूनी आली
निळी माया आकाशाची ।।

गाढी उदी लालसेची
अंगी गेंद उन्मादले
पायीं पैंजणाचा नाद
रानझरा झुळ झुळे ।।

उभा देह निशिगंध
मन मार्दव चमेली
स्पर्श मंद अनिलाचा
तृषा अंतरीं रंगली ।।

नका पापण्यांनो हलू
पितो मदिरा रूपाची
पान आकंठ होताच
देऊं ढेकर तृप्तीचो ।।

≡ ≡

**नीलकंठ जनार्दन मांदाडे** जन्म १९३१. बुनियादि म. मा. विद्यालयांत अध्यापक. कविता करण्याचा छंद असून वाङमयाची आवड आहे.

# शोधुं कुठे तुजला ?

आओ ! शोधुं कुठे तुजला ? ।।धृ.।।

मित्र नभाला सोडुन गेला
चोहिकडे अंधार पसरला
मार्ग दिसेना धड नयनाला
जीव कोंदाटला ।।१।।

चित्ताशा मम साऱ्या तुटल्या
नयनांतुन जलधारा सुटल्या
आवरतां आवरतां मिटल्या–
मअू नयन–पाकळ्या ।।२।।

हतभागी मी होत पोरका
मातृसुखाला होअि पारखा
वियोगाचा मजवर घाला
अवचित हा आला ।।३।।

श्रवणीं घे गे ! करुणा वाणी
विरहाने मी होत निकामी
वात्सल्याची अुणीव भारी
पोळे हृदयाला ।।४।।

देवा ! कां रे निष्ठुर झाला ?
माझी करुणा कां न ये तुला ?
सांग कुठे मम आई मजला–
पडेल दृष्टीला ? ।।५।।

# लाजरी

अुषा प्रभा अुजळली
रानलक्ष्मी शृंगारली
दर्शनास ती चालली
फुललेली फुलवेली ॥१॥

हिरवळीवर लाजरी
डुलत होती साजरी
युवती जणु गोजिरी
अुभी मनांत बावरी ॥२॥

नभोवितान सूत्रधार
पूर्वेच्या क्षितिजावर
प्रणयाचे अुन्माद
सोडी नव कलिकेवर ॥३॥

सुमकळ्या सावरून
लाजरी ही बावरली
दृष्टीक्षेप लावुनिया
सलज्जीत अुतावळी ॥४॥

प्रणयाचा खेळ पहा
दोघांनिहि मांडियला
सूर्याने सहर्ष तिला
पाहियले लाजरिला ॥५॥

नव्या दमाने लाजरी
ल्याली सर्वही तारका
भुलवि भानु प्रियकरा
डुलत डुलत भाविका ॥६॥

अर्कराय नवरदेव
नवरी प्रौढ बालिका
"सुरम्य पहा देखावा"
वनांत होय गवगवा ॥७॥

मारुतहि आनंदला
मंगलपट खोलला
'लग्न खचित लागलें'
कलकलाट जाहला ॥८॥

—नीलकंठ जनार्दन मांदाडे, वडधा

नोंद क्रमांक ... दि: ...

# स्वर्गस्थ मातेस—

साहित्य पूजनाचें घेऊन हाक देते
ये मातृदेवते ! ये; पूजीन आज तूतें ।।धृ.।।

जैं कस्तुरी मृगांगीं तैसा न ठाव लागे
अुमजूनि आज येतां तुटतात आज धागे
कीं मीं अहा मदांधें संरक्षिले न तूतें
गेला अुडून पक्षी कोठे दिगंतरातें ?
कोण्या परी पुकारूं ? हो साह्य कोण मातें ?
ये मातृदेवते ! ये; पूजीन आज तूतें
हरपे परीस माझा मी सांडिला किमर्थ ?
मच्चित्त यांत होतें मानील कोण सार्थ ?
अतिपरिचयादवज्ञा घडली असेल माते !
अनुताप पाप जाळी ये नीर लोचनातें
अपराध घाल पोटीं घेऔ समीप माते
ये मातृदेवते ! ये; पूजीन आज तूतें
मोजेल सागराचें कोणी अथांग पाणी
लावील शास्त्रमार्गें गगनास हात कोणी
बोलेल मूक प्राणी चारी सशास्त्र वेद
लंघून सप्त सिंधू हो पांगुळाहि वंद्य
परि मोल तोलण्यासी तव गे अशक्य माते !
ये मातृदेवते ! ये; पूजीन आज तूतें
जेथे विलीन झाली ती प्राण-ज्योत तूझी
त्या विश्वपालकाला नमनें अखंड माझी

सर्वां समान दृष्टी मातेशिवाय नोहे
ती अेक पांडुरंगीं मी त्यांत भाव पाहे
पाही कृपाकटाक्षें ही अेक आस माते
ये मातृदेवते ! ये; पूजीन आज तूतें

# ही कोण ?

नव्या नवतिचा साज चढअुनी । नटून झगमग वस्त्राभरणीं
अमृतधारा बरसत आली । ढंगदार छबि मनोहारिणी ॥
जर्द केतकी गालावरतीं । अरुण कांतिचा रंग अुधळला
टपोर काळचा डोळचांमधुनी । मुग्ध अलौकिक भाव आगळा ॥
चाफेकळिहुन सरस वाटते । सरल त्याहुनी दिसे नासिका
हंस चालिसम दिमाख देखुन । नूपुर तालावरि धरि ठेका ॥
स्वरलहरींच्या छेडित तारा । लहरत विहरत कैशी येशी ?
दिपली दृष्टी, फुलली सृष्टी । फुलें अुमललीं चंद्र विकासी ॥
अिंद्रधनूपरि चढअुन भ्रुकुटी । सस्मित वदनें काय पाहसी ?
चित्तचकोरी तूंच पौर्णिमा । वेधुन घेसी विश्वात्म्यासी ॥
बाह्य विरोनी आज ठेविसी । यौवनांत का पहिलें पाअुल ॥
विधिही भासे मंत्रमुग्ध तो । आसमंति ती येतां चाहुल ॥
अधिर जनांनो; नका बावरूं । जरा सावरा तोल आपुला
कोण पहा ही स्वर्गसुंदरी । जिने लाविलें वेड जगाला ॥
भावफुलांची घालुन माला । रसिक जनांचीं हृदयें झेलीं
कविहृदयाची मानस कन्या । नवकविता ही जन्मा आली ॥

सौ. लक्ष्मीबाई नानासाहेब कुलकर्णी
" काव्यशारदा " सोलापूर

**श्रीकृष्णाग्रज** अर्फ **डॉ. वामनराव अनंत निपुणगे** हे ज्योतिषी, लेखक व कवि म्हणून प्रसिद्ध असून त्यांच्या व्यवसायांत ते ख्यातनाम आहेत. अनेक वृत्तपत्र, मासिकांतून व काव्यसंग्रहांतून त्यांचें साहित्य प्रसिद्ध असून महाराष्ट्रकवि यशवंत, श्री. गिरीश, श्री. ठोकळ, श्री. ग. ह. पाटील, श्री. गोपीनाथ तळवलकर आदि थोर कवींनीं त्यांच्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले असून त्यांची 'शेजारच्या घरांत' या भावगीताची रेकॉर्ड बरीच गाजली. पाबळ येथे त्यांची प्रॅक्टीस चालू आहे.

# "सौ" स

आलीस तूं माझ्या घरीं । सखे हासऱ्या मुखानं
परी केलास कृतीने । प्रतिस्वर्ग तूं निर्माण ॥१॥
वर्षें लोटली कितीक । बाळगोपाळ घरांत
स्वैर खेळती सानंद । तुझ्या गोड संगतींत ॥२॥
वाढत्या ग संसारांत । श्रमें झालीस तूं दीन
पोटभर अन्न तसें । मिळालें ना वस्त्र छान ॥३॥
कधी घेतला नाहीस । हट्ट दागिन्याकरितां
नाही मावळूं दिलीस । वदनीची प्रसन्नता ! ॥४॥
अपुऱ्या ग पगाराची । होती जाणीव तुजला
फाटकाच संसार तूं । कुणाला ना दिसूं दिला ॥५॥
तिला सहज पुसलें । अेका दिवाळसणाला
"आलें मनांत आणावा । छान अलंकार तुला" ॥६॥
बिलगून मला म्हणे । "हा आहेना अलंकार !
देवो अुदंड आयुष्य । माझ्या देवाला; अीश्वर" ॥७॥

**–श्रीकृष्णाग्रज डॉ. वा. अ. निपुणगे, पाबळ**

**सौ. सावित्रीदेवी निपुणगे** यांनी पतींच्या सहवासांत वैद्यकी शिक्षण संपादन केलें. ‘ घरचा वैद्य ’, ‘ प्रभातशोभा ’, ‘ भावगीत रामायण ’ हीं त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध असून कवि मनमोहन, तळवलकर, श्री. बाळशास्त्री हरिदास वगैरेंनी त्यांच्या काव्याची तारीफ केली असून पावळ येथें त्याचा वैद्यकीय व्यवसाय चालू आहे.

# होईन मी—

होईन मी रातराणी तुझ्या राहीन अंगणीं
दरवळोनी रात्रीला तुला घालीन मोहिनी
होईन मी खोडकर मंद वायूची झुळूक
तुझा कृष्ण केशपाश चुंबीन रे सकौतुक
होईन मी आल्हादद शुभ्र शीतल चांदणं
मृदु शय्येवर तुला सुखवावया येओन
होईन मी आनंदाश्रू तुझ्या नयनीं राहीनन
तुझ्या कपोलीचें गोड– स्मित हास्य मी होओी
होईन मी तुझ्या मस्त– लाली अधरांवरची
नित्य करीन शिंपणी मधु अमृतरसाचो
होईन मी स्निग्ध शुभ्र दूध दही मधुतर
पूजितांना ओसंडेंन तुझ्या अंगकांतीवर
होईन मी कधी धूप कधी कर्पूर होओन
तुझ्या सेवेसाठी काया अहर्निश झिजवीन
होईन मी फुलवात प्रेमभावें ओवाळीन
आणि तुझ्या स्वरूपांत पूर्ण होईन विलीन
होईन मी अत्यानंदें तुझ्या कंठीचा ताईत
लागेल रे झोप तदा तुझ्या छातीवर शांत
होईन मी राणी स्थापी हृदयाच्या सिंहासनीं
पदच्युत नको करूं सविनय विनवणी !

**सौ. सावित्रीदेवी निपुणगे, पावळ**

# शाळेला जाणार !

आओी, मी जाणार शाळेला। ।धृ.।।

तोंड धुऊनी, स्नान करूनी
स्वच्छ सदरा चड्डी घालुनी
येओी तिथवर सोडायाला ।।१।।

पायीं छोटी सुंदर चप्पल
पाटी पुस्तक, मोठी पेन्सिल
पिशवी गळ्यांत घालायाला ।।२।।

रोज रोज शाळेला जाअिन
नंबर पहिला लवकर घेअिन
दूध देअि गे मज प्यायाला ।।३।।

बबडी, चंदू सारे जातिल
मजला मागे पहा टाकतिल
त्यांच्या आधी जाअुदे मला ।।४।।

खूप शिकूनी गुरुजी होअिन
अैटित बसुनी मुलांस शिकविन
पगार मिळविन दर महिन्याला ।।५।।

भरपुर पैसे जेव्हां मिळविन
सुंदर साडी तुजला आणिन
रोज तुला गे नेसायाला ।।६।।

-अवधूत भिमराव म्हमाणे
कोरवली

**शा. सी. धनभर** हे वरवट बकाल येथे अध्यापक असून यांचें साहित्य मुलांचें मासिक, बालशिक्षण, बालविद्या, बालसेवा, बालविकास, बालसन्मित्र, मार्गदर्शक वगैरे ठिकाणीं व फुलोरा आणि कलिका या काव्यसंग्रहांतून प्रसिद्ध झालें आहे. ते अेक विनोदमूर्ती असून अुत्कृष्ट नकला करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. 'नवा सवंगडी' हें बालमासिक त्यांनी काढलें असून त्यांचा 'बालविजय' हा बालगीत संग्रह लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

## बाळहट्ट

सासूबाअी ! सासूबाअी !
सांगा माझी चूक
बाळ रडतो फार
त्यास लागली भूक

म्हणून तर बाअी
त्यांस मीं वाढलें
बाळ हट्टी फार
सोबत मी जेवलें !

बाळाला नेलें फिरावया
म्हणे "चल सिनेमाला"
खरं हे सासूबाअी !
वेळ लागला कामाला

बाळ हट्टी फार
मी हो काय करूं ?
म्हणून म्हणतें बाअी
"नका मजवर रुसूं !"

—शा. सी. धनभर, वरवटबकाल



**मधुकर गोपाळ गरुड** यांचा जन्म १९२४ मध्यें झाला असून 'नीरांजन' या काव्यसंग्रहांत त्यांचें काव्य प्रसिद्ध आहे. शिक्षण मॅट्रीक, हिंदी शिक्षक सनद. मराठी वाङमयाची विशेष आवड. कुसुमाग्रज, तांबे, निकुंब इत्यादींचा विशेष अभ्यास.

# तुझा सहवास

मला तर हवा तुझा सहवास ॥धृ.॥


तुझ्याच हातीं माझें जीवन
तुझ्याविना तें होअिल रसहिन
तूं सौख्याची रास ॥१॥

तूं तर माझी स्फूर्तीदात्री
मांगल्याची मिळे प्रचीती
भरती स्वर्गसुखास ॥२॥

तुझ्या सन्निधीं चित्त रंगलें
हृदयीं तव पडसाद अुमटले
पुरव जिवाची आस ॥३॥

—मधुकर गोपाळ गरुड, पालघर

**म. ना. श्रीखंडे** हे विद्यार्थी असून कांही प्रातिनिधिक काव्यसंग्रहांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध असून 'मंदा', 'अंकुर' हे काव्यसंग्रह व 'प्रेमभंग' हें नाटक प्रकाशनाच्या वाटेवर आहे



## आराधना

तुझ्या मंदिरांत
प्राजक्ताचा सडा
सुगंधाने वेडा बनविलें
तुझ्या प्रासादांत
राहते मेनका
पावलांचा ठेका, भुलवितो
आकाश गंगेंत
आहे दुग्धपाणी
जातों विसरूनी देहभान
सोमाचाही रस
चढवितो नशा
मानवाची आशा सोडलेली
नको अंगिकारू
पाषाणाचें मौन
नको धरू ध्यान चिरंतन
नको बघूं अंत
सावरेल तोल
जीवनाचें मोल, आराधना !

—म. ना. श्रीखंडे, वरुड

**व्यंकटेश माणिकराव कोलंबीकर ऊर्फ 'त्रिवेणी-कुमार'** जन्म १९३४. शिक्षण अिंटरआर्टस्. कविता करण्याचा छंद. काव्यकुंज, श्रीगुरुदेव, रोहिणी वगैरे ठिकाणीं साहित्य प्रसिद्ध. सामाजिक कार्याची व मुलांकडून हस्तलिखितें काढण्याची हौस. पेठवडज येथील हायस्कूलमधे शिक्षक.

## :: शरदाच्या गारव्यांत ::

शरदाच्या गारव्यांत
पाजळल्या दोन ज्योति
गारठल्या कारंजाच्या
उफाळल्या स्वैरगति !
बकुळीच्या फुलांतच
घट्ट बसली चंद्रिका
संकोचून दडतसें
कुंजवनीही राधिका.
उमललीं प्रीतफुलें
विखुरला भावगंध
सुखावला आसमंत
झुलें रान मनी धुंद.
सात सूर बागडती
हृदयीची खुले प्रीत
आनंदली रात्र मनीं
झालें सुरू मधुगीत.
नको दडूं पानाआड
कळी जशी ही चोरटी
वेड्या मना लावी पिसें
भाव नजर गोरटी !

—'त्रिवेणीकुमार' व्यं. मा. कोलंबीकर, पेठवडज

**रामराव धर्माजी शिगटवार** अूर्फ **'धर्मतनय'** यांचा जन्म १९३७ ला झाला. अुस्मानिया विद्यापिठाचे अिंटर, साहित्य सुधाकर, साहित्य प्रवीण, हिंदीभूषण. खेळ, वक्तृत्व, अध्यापन, नाटचकला, चित्रकला यांची आवड. विद्यार्थी दशेपासून काव्याचा नाद. 'भारत' काव्यसंग्रहांत काव्य प्रसिद्ध. कें. प्रा. कम्. अुच्चशिक्षणालय येथील सरकारी शाळेंत ते शिक्षक आहेत.

# नव आशेची बाग बहरली

नयनीं तुझिया मोहरलेली
नव आशेची बाग बहरली ।।धृ.।।

मधुर गुलाबी तव स्वप्नाची
भाव प्रीतिच्या मधु रंगाची
उधळित असतां मोहक लाली
सस्मित गाली छटा पसरली ।।१।।

सुंदर गोंडस गुलाब फुलले
फूलपांखरू हृदयामधलें
प्रीती–सुमनीं क्षणैक बसलें
लोचनांतल्या तेजोगोली ।।२।।

पराग प्रीती फेकत असतां
सुगंध पसरे त्याचा आता
प्रेम पुजारी येईल, वनिता !
मोहित होइल स्वच्छंदे अलि ।।३।।

–धर्मतनय

रा. ध. शिगटवार, पेठवडज

**मोहनलाल जनार्दन नसकरी.** जन्म १९३६. बऱ्याच मासिकांतून काव्य प्रसिद्ध. 'पाझरता झरा' काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर. अुंबडीबाजार येथे अध्यापक. लहानपणापासून भजनें करण्याचा व म्हणण्याचा नाद.

# प्राण सुमार्गी जाणार !

असुर राष्ट्रांनी हानी
केली हिम पायथ्याशीं
भारताचें रक्त सांडें
झगडतां असुरांशीं ॥१॥

मराठयांचें रक्त आतां
अुसळेल जेव्हां पुढे
सज्जसेना पायथ्याला
क्रांतिवीर होती खडे ॥२॥

असुरांचें रक्त चाखूं
भारताच्या रक्षणाला
कोटिकोटी प्राण अर्पूं
आणूं यश भारताला ॥३॥

रणभूमी सज्ज ठेवूं
भारताची सीमा लढूं
जागूं आपुल्या कार्याशीं
चीन सेनाहि पिटाळूं ॥४॥

अन्याया सहन कधी
आम्ही नच करणार
रोम रोम खवळेल
प्राण सुमार्गी जाणार ॥५॥

—मो. ज. नसकरी, अुंबडीबाजार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
 अनुक्रमांक 38090 वि. 4114 
क्रमांक 94120 नों. 30494

# भाऊराया

आला आला आला, भाऊराया मज घरीं ॥धृ.॥
वाट किती मी बघतें दारीं
भाऊराया ! म्हणुन पुकारी
धांदल झाली माझी सारी
पंचारती घेऊनी ओवाळितें दारी ॥१॥

लावितें कपाळां चंदनाचा टिळा
वाहते वेड्या मायेची माळा
लावितें अंगीं चंदनाची उटी
बसवितें बघा चंदनाच्या पाटीं
घास घालिते सोन्याच्या ताटी
आनंदी आनंद बहरला मजघरीं ॥२॥

तुझ्या स्पर्शें उजळलें घरदार
प्रेमाश्रूंचा पाट पुरेपुर
भोळ्या बहिणीची भोळी माया
किति दिवसाची भेट भाउराया ?
आनंदाच्या फुलल्या लहरी ॥३॥

माझ्या भाऊचा राजाचा थाट
त्याला साजेसा करि थाट माट
भाउ बहिणीच्या भेटीने रे
तृप्त जाहली माझि आस रे
आज लक्ष दीप उजळले दारीं ॥४॥

—आनंद अंकुश खडपकर, मिर्याबांदा

# झाशीची राणी

डोळ्यांपुढती चित्र तरळतें सत्तावनच्या समराचें
रणरागिणिच्या पराक्रमाचें, धैर्याचें अन् शौर्याचें ॥१॥

स्वातंत्र्यास्तव झाशीच्या, ती लढली परक्या शत्रूंशीं
किल्ल्यावरुनी घोडा फेकी बाळ बांधुनी पाठीशीं ॥२॥

वेष घेतला मर्दानी त्या वीररमणिने रणसमयीं
त्वेषाने ती आङ्ग्लावरती वार करित वेगें जाअी ॥३॥

पाठलाग करि शत्रु तियेचा, अेकलीच मग ती धावे
करी निश्चयां मनांत रमणी 'शरिर अग्निला अर्पावें' ॥४॥

म्हणे 'झाशिचें करीन रक्षण प्राणपणाला लावूनी'
'मरणिं अमरता' तत्त्व थोर तें आचरणाने पटवूनी ॥५॥

गौरविती किति कवी कौतुकें, शाहिर गाती पोवाडे
'रणरागिणि बिजली' म्हणती तिज, अुपमांचा वर्षाव पडे ।६।

काढी धन्योद्‌गार शत्रुही, चकीत झालें जग फार
स्वकीय जनता हळहळली बहु, दुःखाला त्या ना पार ॥७॥

जन्मशताब्दी दिनीं तियेचें गाअूं आपण यशगान
झाशीच्या राणीचा करुं या अुत्साहानें सन्मान ॥८॥

चरित्र तीचें अुज्वल अगदी स्फूर्तीदायी अती असें
भरतभूमिच्या कुशीं जन्मुनी धन्य करविले तिला तसे ।९।

स्मृति–सुमनांजलि वाहूं प्रेमें जन्मशताब्दी दिन आज
प्रयत्न त्यांचे सफल जाहले, लोकशाहिचें ये राज्य ॥१०॥

**अिंदिराबाई करकमकर, सोलापूर**

**प्रल्हाद अुद्धव वाघमारे** हे टी. टी. सी., राष्ट्रभाषा परिचय अुत्तीर्ण असून धानोरा येथे अध्यापक आहेत. मराठी व हिंदी या दोन्ही भाषांचाहि व्यासंग असून वाङमयाची यांना आवड आहे. विविध विषयांवर यांचें काव्यलेखन आहे.

# शाळेला जाणार !

शाळेला जाणार
आअी ! शाळेला जाणार ॥धृ.॥

पाटी पेन्सिल घेअुनि हातीं
मुलें सर्व, शाळेला जातीं
मीही पण जाणार ॥१॥

रोज रोज त्या शाळेमधुनी
फिरतां फिरतां बागेंतूनी
मौजच मी बघणार ॥२॥

गुलाब, जाअी, जुअि, शेवंती
पुष्पें कांही तोडुनि हातीं
हार मी करणार ॥३॥

संध्याकाळीं शाळा सुटतां
मुलासवें मी खेळ खेळतां
भान मला नसणार ॥४॥

—**प्रल्हाद अुद्धव वाघमारे गुरुजी**
**धानोरा**

**वसंत शंकर बापट** हे सेकंड अियर ट्रेंड शिक्षक असून कविता व गोष्टी लिहिण्याचा यांना छंद आहे. लहान मुलांचे हे आवडते लेखक आहेत.

# ० कोयना ०

कोयनानगरीं तारे लुकलुकती
दीप नच हे परि तारेच गमती ।।धृ.।।


साज दिसे त्या स्थळां ।
रजनीच्या शांत वेळां
सतेज ती अवनी देखुनि गुंग झाली मति ।।१।।

नेत्यांनी योजना केली ।
कार्या सुरवात झाली ।
कामगार, कल्पक आदि तेथे राहती ।।२।।

कोयनेच्या जलामुळें ।
महाराष्ट्रा भाग्यामुळें ।
अवाढव्य कार्य पाहतां जन स्तुति करिती ।।३।।

भाग्य आलें कोकणचें ।
राज्य झालें कोयनेचें ।
कोयना धरणाची केवढि महति ! ।।४।।

—वसंत शंकर बापट, वाकवली



**चंद्रकांत परशुराम बीडकर.** जन्म १९४०. प्राथमिक व दुय्यम शिक्षण अक्कलकोट येथे. अुच्च शिक्षण सातारा येथे. संजय, अमृत, ललना वगैरें मासिकांतून साहित्य प्रसिद्ध. सातारा रोड येथील कूपर अिंजिनिअरिंग लिमिटेड या कारखान्यांत ते अिन्स्पेक्टर आहेत.

## माहेर

कितिक दिसांनी आले
मी माहेरी
ओवाळ ग आई; माझ्यावरुनी–
मीठ–मोहरी

अंगणांतला पारिजातक
लावितो मला बघ दृष्ट
माझ्या ओठांची सर
त्याच्या देठाला कशी यायची !

## पणती

पडक्या घरांत मिणमिणती पणती
भिंतीविण तिज कोण पाहती
तिला वाटते यावे कुणितरि...
आपुल्या संगे नांदायाला–
अुगीच बघतो खट्याळ वारा
त्यांस वाटते प्रणय करावा
पणती– तर कांही बोलत नाही
वाराही क्षणभर वहात नाही–
घाबरुनि मग बघते 'पणती'
अन् तिथेच माझे पाय थबकती...

॥॥ ॥॥

## — बंधन —

तारुण्याचा तुला बहर आलाय–
म्हणून कां तूं अितकी चंचल दिसतेस ?
पण हाय गडे !
तुझा तो पिवळा – पदर
तुला वेळींच सावध करतोय–
आतां तरी शुद्धीवर ये...
अन् मुली !
विसरुनि ते गतक्षण
तू सुजाण हो...

–चंद्रकान्त परशुराम बीडकर, सातारा

# आपण बरें तर जग बरें !

आपण बरें तर जग बरें। हें नित्य पाहतों आपण खरें ।।धृ.।।
गुळाभोवतीं मुंग्या जमती। मधमाशांची तशीच रीती
भुतें; शितें असल्यांवर जमतीं। मोठ्यांचे हे बोल खरे ।।१।।
दारिद्र्याला कुणि न विचारति। सकल गुणांकित असे धनपती
बहिणीची भावावर प्रीती। बस्तानच जोवरति बरें ।।२।।
आंधळ्यास जन सर्व आंधळे। बुडता म्हणतो जग हें बुडलें
संचितावरी जग हें हालें। साधू म्हणती हेंच खरें ।।३।।
गरीब अन्नास्तव वणवणती। बड्या जनांना 'खाने' येतां
जगांत असली अुलटी रीती। भूक म्हणोनी गरिब मरे ।।४।।
धन-कीर्तीनी आले खालीं। दुर्भाग्याची कमाल झाली
जगांत त्यांचा कुणी न वाली। वाटे त्यांना मरण बरें ।।५।।

## अभंग

पांडुरंगा तुझी मूर्ती। माझ्या जिवाची विश्रांती
काय वर्णूं तुझे गुण। शेष थकला गुण गाअुन ।।
तूं सागर मी हो मीन। मत्स्य न जगे जलाविण
तैसी स्थिती असे माझी। ठाव चरणीं द्यावा आजीं ।।
बालकाची अेक आशा। तूंच पुरवी जगदीशा
घडावा अखंड नामोच्चार। देवा मागणें नाही फार ।।
चित्तीं असूं द्यावी शांती। समाधानी ठेवी वृत्ती
गोविंदाची तूं माअुली। बाळासाठी धाव घाली ।।

—'यशवंतात्मज' गोविंद यशवंत कुलकर्णी, सोलापूर

# • ओला गंध पापणीचा •

ओला गंध पापणीचा
हुंगताती वेडयास्मृति...
स्वप्नाळल्या आसवांत
कोरी बुजलेल्या नक्षी !

चितारले जुने रंग
मुकें गीत साकारिलें
ओलावल्या पापणींत
सूर तेच अुमटले !

घोंघावला तोच शब्द
काजव्याच्या भ्रमणांत
व्याकुळला अुसासाहि
चिरलेल्या अंधारांत !

श्वास आज शब्द आज
वलयल्या हृदयाचा
कांठ कांठ ओला चिंब
रक्ताळल्या वेदनेचा !

॥॥ ॥॥

## शाप—

माझ्या जिवंत प्रेताचें
आज पेटलें सरण
तुझा शाप भोगण्याला
माझें हांसतें मरण !

—जगन वंजारी, अमरावती

यांचें संपूर्ण नांव **भगवंत नागोराव फड.** यांचा जन्म २५ डिसेंबर १९३८ ला झाला. हे मोमिनाबाद तालुक्यातील दौंडवाडीचे राहणारे. सध्या ते मुरुंबा येथे अध्यापक आहेत. 'काव्यजयंति' चे हे कार्यवाह होते. काव्याची आवड.

## कवीस–

गोळा करुनी संग्रह करुंया
काव्याचा छान

संग्रह पाहुनि आनंदाची
स्फुरेल मग तान ॥१॥

कवी जनांनो; अुदया तुमच्या
काळ बघा आला


नव्या मनाच्या नव्या कल्पना
पहा रचायाला ॥२॥

नव्या जगाच्या, नव्या भावना, साऱ्या मांडून
काव्यदीप हा, मानव पाहिल चकीत होअून ॥३॥

स्फूर्ती येअिल नव नव कविंना काव्य रचायाची
प्रसन्न होतिल रसिक; 'और ही गोडी काव्याची !'

≡ ≡

# जगांत महती......



"अेक सखे; मम बोल जरा तूं
अेकत्रच दोघें बघ राहूं
"करुं संसारहि प्रेम–सुखाने
आनंदाचे दिन ते पाहूं ॥१॥

तुला पाहुनी हृदय हरवतें
होअि असे कां ? मला न कळतें
गूढ तुझ्यामधि असें काय तें ?
प्रिये; सांग जें, मज ना कळतें ॥२॥

तव प्रेमाचा असे भुकेला
तयार, म्हणशिल तें करण्याला
तुझ्याचसाठी सिद्ध असें मी
सर्वस्वहि तें त्यागायाला ! " ॥३॥

* * *

" तुझ्या मनांतिल कावा समजे
कळलें सारें तुझें मनोगत
स्वार्थ साधण्या भुरळ पाडिशी
विचार तव रे; टिकतिल शाश्वत ?
किंमत ना सध्या वचनाला
जगांत महती चारित्र्याला "

–भगवंत नागोराव फड, मुरुंबा

# विसरा नि क्षमा करा



" विसरा, क्षमा करा नी "
तूं याचिलें कितीदा
" क्षमितों, न विस्मरें मी "
कथिलें तुला दहादा ॥
सखये; *स्वसेन आर्ये;
'स्मरणें न, माफ करणें '
यां मधिल अंतराला
अुपमा अशक्य मिळणें ॥
'क्षमणें ' सुशक्य आहे, माझ्या विशाल हृदया
'स्मरणें न ' शक्य नाही कितिही महान ▲सदया

*भगिनी; ▲दयावंताला

# तूं हास ग—

तूं हास ग, पुन्हा हास ग
तुझ्या हास्यांत संजिवनि शक्ति ग
तूं रड ग, पुन्हा रड ग
तुझ्या रडयांत अप्सरांचे लाघ ग
मुठि झाक ग, पुन्हा झाक ग
तुझ्या मुठींत लाखांहुन जास्त ग
तूं रांग ग, पुन्हां रांग ग
तुझ्या चालींत नर्तिकेची गत ग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नुक्र ८८९८ वि: MC
आक ९६८०० नों दि

तूं डोल ग, पुन्हा डोल ग
तुझ्या डुलण्यांत नागिणिचा डौल ग
पाय झाड ग, पुन्हा झाड ग
तुझ्या लाथेंत साखरेचि गोडि ग

|||| ||||

## अुपाशी पोराचें गाणें

आअी, देवाला घातलें अुपाशी ग
अुपासाचें दुःख त्याला कळेल ग
काकाने दिला ग आणा
गूळ वा साखर आणा
नैवेद्य त्याचा करा ना
आम्ही देवाला घातलें अुपाशी ग
अुपासाचें फळ त्याला मिळालं ग
आण्याच्या घेतल्या चिर्मुल्या
होत आम्हा त्याच भल्या
दोघांनि मिळुनी खाल्ल्या
आम्ही देवाला घातलें अुपाशी ग
अुपासाचि रुचि त्याला कळेल ग
काल पासूनची भूक
कोणी ना घातली भीक
आमची कसली चूक ?
आअी, देवाला घातलें अुपाशी ग
अुपासाचें दुःख त्याला कळेल ग

—डॉ. अनंतराव सरदेसाअी, म्हारदळ

**वासुदेव मोरेश्वर भिडे.** जन्म १९१८. शिक्षण मॅट्रिक, हिंदी प्रवीण व शेतकीचा डिप्लोमा. शेतकी मदतनीस म्हणून १४ वर्षें नोकरी. अेकता, शेतकरी, कल्याण, शलाका, अभ्यर्चना, शेतकी आणि शेतकरी वगैरेंमधून साहित्य प्रसिद्ध.

# ॥ जय महाराष्ट्रा ॥

जय महाराष्ट्रा मराठिराष्ट्रा मंगलमय तूं प्राण तूं ॥धृ.॥

जुना वृक्ष अन् जुनींच पानें जुन्या साअुल्या जुन्या अुन्हानें
आज बहरला मांगल्याने फलसंकेतक पुष्प तूं ॥१॥ मंगलमय तूं.

जुनी देवळी, जुनीच पणती, तेलहि होतें, होत्या वाती
आज प्रगटली तिथे तेवती मांगल्याची ज्योत तूं ॥२॥ मंगल.

यंत्रें पट्टे चक्क्या होत्या कापुस-साचे चात्या होत्या
जडांस येण्या गतीमानता अॆंजिनातली वाफ तूं ॥३॥ मंगल.

सुकलेला तर प्रदेश सारा संतत वाहे नभांत वारा
खोल खोल जल पहा उपसण्यां वाऱ्यावरली चक्कि तूं ॥४॥ मं.

पोटीं आहे क्षुधा पेटती, कांचेमधुनी जिन्नस दिसती
कुलुप जीमुळें होअि खुलें ती भाग्यश्रीची चावि तूं ॥५॥ मं.

इतिहासाची तुज श्रीमंती, युद्धामध्यें निधडी छाती
बुद्धिवैभवें जगांत गातीं सादर वदता धन्य तूं ॥६॥ मंगल.

# " सप्तमी " आली !

अहा ! ही ' सप्तमी ' आली, कलेनें वाढला अिंदू
स्वभावें शब्दसुमनांनी स्वमाता शारदा वंदू ॥१॥

जशी ये सप्तरंगांनी सुशोभा अिंद्रचापाला
स्वरुपें 'सप्तमी' देवो तजेला काव्यप्रांताला ॥२॥

जनांना लोभवी व्योमीं ॠषींचा तारकापुंज
रसज्ञां 'सप्तमी' भासो प्रभावी भावनाकुंज ॥३॥

सदा सप्ताश्व आकाशीं झरारा लंघिती पंथ
स्वशब्दें 'सप्तमी' जिंको जनांचे पूर्ण हृत्प्रांत ॥४॥

स्वरांच्या सप्तका संगें निनादे तान संगीत
झळाळो सप्तमी गंधें कवींची कल्पनारीत ॥५॥

विवाहीं सप्तपादांनी प्रकर्षें चारुता प्राप्त
गुणाढ्यें ' सप्तमी ' पावो गुणज्ञीं मान्यता दीप्त ॥६॥

सुमंत्रें सप्तजिव्हाग्नी जसा दे हव्य देवांना
सुतंत्रें ' सप्तमी ' देवो रसश्री स्वाद सर्वांना ॥७॥

रथाची सप्तमी येतां रवीचें तेज जोरावें
' अघोरां ' सप्तमीसंगे यशाचें श्रेय अुचावें ॥८॥

अहो याहो रसीकांनो; लुटा हा सप्तमी मेवा
यथाशक्ती पुढे वाढू, चवीने शांतसे जेवा ॥९॥

# शेतकऱ्यांचा जयजयकार !

रुष्ट न होती कष्ट सोशिती
मोति पिकविती तारणहार
मुखांमुखांतुनि सहज निघावा
शेतकऱ्यांचा जयजयकार

बळिराजांचा जयजयकार ॥धृ.॥

दणकट बांधा पोलादासम । अथांग सागर मन त्याचें ॥
राकट मूर्ती परी अंतरीं । पाझर झरतीं श्रद्धेचे ॥
थंडी वारा पाउस मारा । ऊनहि पचवी ग्रीष्माचें
भुकेस कोंडा निजेस धोंडा । चिन्ह न तोंडा चिंतेचें ॥

उत्साहाचें भरतें येतां । मोटेवर तो घे ललकार
मुक्या जिवांचा जानी यार । गीतांनी दुमदुमे शिवार ॥
नार अेकली नीर खेळवी । शेति सळसळे हिरवीगार ॥१॥

मोटेसाठी औतापाठी । दिवसांकाठीं फिरे किती ॥
रात्र असो अंधार असो कीं । असो अेकला, नसे भिती ॥
खात भाकरी, बैल हाकारी । अुभ्याअुभ्याने न्याहरि करी ॥
दंडामधल्या दोन ओंजळी । गिळुनी अंतीं चूळ भरी ॥

तंबाखूची चिमटी चुरडित । डबी कोरुनी, बार भरी ॥
कामाची मग जुपी करी । ध्यास त्यास ना अन्य अुरीं ॥
कामामागुनि काम संपतें । हिंमत अुरते अपरंपार ॥२॥

# शीघ्र साधूंया घडी

क्रांतिकारी अग्रणी जे
इंग्रजांशीं झुंजले
गांजले अन् पिंजले–१

मात्र त्यांचा त्याग मर्मी
अग्निधर्मी जाहला
पेटला डोंबाळला–२

आणि पृथ्वीने गिळावें
चक्र कर्णाचें जसें
इंग्रजां झालें तसें–३

फाटलें आभाळ त्यांना
वाघ मागें लागला
बाणभाता आटला–४

पांढऱ्या पायींच केलें
तोंड काळें येथुनी
'जाव' शब्दां ऐकुनी–५

मुक्तिची ललकारि झाली
दास्यबेडी भंगली
भाग्यप्राची रंगली–६

संपली साम्राज्यशाही
राज्य सर्वांचें अिथे
लोकशाही नांदते–७

तो तिरंगी तुंग भागीं
पंचप्राणें डोलवूं
शान त्याची वाढवूं–८

प्राण देअूं प्राण घेअूं
ज्योत ठेवूं तेवती
दक्ष राहूं भोंवतीं–९

पंधरा ऑगस्ट झालें
वर्ष चौदावें सुरूं
लाज थोडीशी धरूं–१०

अन्न द्याहो ! धान्य द्याहो !
भीक अन्यां मागणें
काय देशां भूषणें ?–११

वाढवूं अुत्पन्न शेतीं
संथवूं जन्मांक तो
मेळ घालूं शक्यतों–१२

स्वावलंबी पूर्ण होअूं
शोभवूं स्वाधीनता
शुद्ध गप्पा अन्यथा–१३

वेळ गेली, प्राप्त होणें
शक्य नाही या जगीं
कां बसावें हो अुगीं–१४

व्यर्थ शंका गर्व वाया
या निघूंया तातडी
शीघ्र साधूंया घडी–१५

# सासूबाईंची धांदल

‘ जनतेनं ’ निघणार । जेवायास येतिल घरीं ।।
होणं नव्हें पुरणाचं । करूं या ग श्रीखंडपुरी ।।१।।
ताई आक्का अन् द्वारका । नीट लावा ग पसारा ।।
मुळीं सुद्धां गमूं नका । लोणि कढवा, भाज्या चिरा ।।२।।
काढतें मी रवा छान । ओलवून शेतगहूं ।।
कुसूमचे यजमान । यायचे ग ‘सदूभाऊ’ ।।३।।
मुंबओचे रहीवासी । प्रथमच खेडेगावां ।।
तसे आहेत ते हौशी । आवडेल कां देखावा ? ।।४।।
स्टेशनास जाया हवं । इथ कुठली मोटार ? ।।
गाडि जोडोनी माधव । तूंच जारे वेळेवर ।।५।।
नवस रे सांबा तुला । करवीन अभीषेक ।।
झाक माझ्या अुणीवेला । सुखी ठेव माझी लेक ।।६।।

।।।।

# कोरडवाहू शेतीचें सार

बांध–मशागत–पेरा–
पाणसळीने, अुजाळ शेतांत
पट्यांत विरल पेरुनि,
खत–कोळपण्या सुयोग्य कालांत
पालट साधुनि पेरा,
पट्टे तृणधान्य डाळिधान्यांचे–
तीनास अेक क्षेत्रीं,
अिंगित हें कोरडचा कृषिरितीचें

–वासुदेव मोरेश्वर भिडे, सोलापूर.



## अनिल र. चांदेकर

जन्म १९४०. १९५७ पासून काव्यलेखन. इंटर सायन्स झाल्यावर औरंगाबाद येथे पॉलिटेक्नीकमध्यें ते सध्या तांत्रिक शिक्षण घेत आहेत. आवडते कवि मर्ढेकर पाडगावकर, कुसुमाग्रज. आवडते लेखक—खांडेकर, गोखले, अत्रे.

# बरसात—

सखा हरवला सखा हरवला
निराश झाली रात चांदणी
शोधित शोधित आणि नभाची
खिन्न जाहली भोळी चिमणी ! ॥१॥

आकाशाचें नीळें कबूतर जळत राहीलें; झालें काळें
अनील वेडा पिऊं लागला गंधाविन ते रितेच प्याले ! ॥२॥

सुरू जाहली पोपटपंची विसरुन सगळ्या व्यथा मनाच्या
सर्व सर्व ते गाअु लागले जरी तयांना नव्हती वाचा ! ! ॥३॥

अखेर हरिणी बनतां नागिण
काजळ येअुन बसलें नयनीं
वीज चमकली मधेच लखकन्
रडूं लागली वेडी रजनी ॥४॥

—अनिल चांदेकर, औरंगाबाद

# ✵ मोह ✵

छंद सुटेना, बंध तुटेना
कमलावरुनी भ्रमर अुठेना !
रोज दिनांतीं बंध तंतुचे
रोज रोज ते गंध सुमांचे
धुंद लाजरे भाव मदांचे
तरीहि त्याचें चित्त विटेना !
कमलावरुनी भ्रमर अुठेना ॥ ॥

भोग भोगितां भोग वाढती
तृप्ती मधुनी जन्मे ऽ तृप्ती
मोह विवेका दाबुन धरती
कांही केल्या बंध तुटेना
कमलावरुनी भ्रमर अुठेना ! ॥२॥

हीच अभिरुची शैशवातली
तारुण्यांतहि वाढत गेली
वृद्धापकाळि ढळलें यौवन
तरी मनाचा छंद सुटेना !
कमलावरुनी भ्रमर अुठेना ॥३॥

पानच पिवळें मिळें मातिला
कुशित तियेच्या शिरून वदलें
'जन्म हवा मज जन्म हवा मज'
आणि तयाचें वेड सरेना
कमलावरुनी भ्रमर अुठेना ॥४॥

॥॥ ॥॥

# भावद !

मनास माझ्या जेव्हां पडती
असंख्य अगणित बारिक भोकें
आणि ठिबकती थेंब अश्रुचें
हृदयामधुनी स्पंदन ठोके ॥१॥

त्याच क्षणाला नभही गळते
अुदास अविचल होतो वायू
गलीत आणिक बधीर सारे
सृष्टी बसते अखडुन स्नायू ॥२॥

मनांत माझ्या जेव्हां असतो
जल्लोषच त्या सुखदु:खांचा
स्वर्ग विसावे धरा हांसते
कणांकणांतुन भाव सुमांचा ॥३॥

वसन्त जगतीं तेव्हां फुलतो
तेव्हां तारे चमचम करतो
फेनिल सारा अथांग दर्या
तेव्हां सारी भरती भरती ॥४॥

वसंत ग्रीष्महि हृदयीं माझ्या
सुख-दु:खांचें हो भावद हे
जेव्हां लागे जें जें कांही
भाण्डार तयाचें अुघडें हें ॥५॥

—"शेखर" चंद्रकांत बिवरे
रा. भा. पंडित, खोपोली

# माझा भारत

स्वतंत्र गाजतो साचा । हा माझा भारत भाग्याचा ॥धृ ॥

गुल्ममगिरिच्या तोडुन बेडया । सुहास्य वदनें मिरवी झेंड्यां
गांधी, नेहरू, सुभाष, नानांचा ॥१॥
वैऱ्याने केलाच दुभंग । वैभवशाली नटे अभंग
रामकृष्णादि देवांचा ॥२॥
खांद्याशीं लावुनिया खांदे । बंधुप्रेमें जगतीं नांदे
हिंदू मुस्लिम बुद्धाचा
हा माझा भारत भाग्याचा ॥३॥

–गुलाब सूर्यभानजी मेहरे, धनजखुर्द

## 'षष्ठी' काव्यसंग्रहावरील कांही अभिप्राय

नवा ग्रंथ 'षष्ठी' नवें वर्ष आज । अघोरादिकांनी दिला त्यास साज
प्रथा चालली पांच वर्षें अखंड । नवा येत अुन्मेष ना त्यांत खंड ॥
प्रसिद्धीस आणोनिया पांच ग्रंथ । प्रफुल्लीत केला तये काव्यप्रांत
सहावा दिसे ग्रंथ 'षष्ठी' समोर । मिळे भाग्य हें थोर तुम्हा अघोर ॥
कवीथोर नी सान सामील यांत । कुणाला 'नको आज शृंगार' त्यांत
कुणी 'भैरवी' गान गाअी मनाचें । कुणा 'शल्य' तें 'भंगलें स्वप्न' ज्याचें
कुणा सोबती जीवनांतील 'आशा' । कुणाला तिन्ही सांज होतां निराशा
कुणाला रवीवार तो आळसाचा । कुणा आवडे लेप तो 'काजळाचा'
नका जीवनां सर्प मानू अघोरा । नसे काय सौख्यां मुळी तेथ थारा?
नका त्या म्हणू मानवा सर्पकात । नको ही निराशा, असें सौख्य त्यांत
असे सुप्त शक्ती किती मानवांत । करी सृष्टिचेही वरी तोच मात

कवींना प्रकाशांत आणावयांस । तुम्ही साहिलें कष्ट नी कोण त्रास
किती सामुदायीक काव्यें निघालीं । तयें काव्यसृष्टी फुलोनीच गेली
सदा ठेविलें कार्य सातत्य अंगीं । तयाच्या यशा गाउया याप्रसंगीं
कवी थोर 'वैशाख' अध्यक्षस्थानीं । तुम्हां लाभलें धन्यता त्यांत मानी
करावी तयांनी प्रकाशीत 'षष्ठी' । अम्हा धन्यता वाटते त्यांत मोठी
कवी कँक त्यांना प्रसिद्धीस वाट । मिळाली अघोरामुळे आज थेट
अखंडीत त्यांना मिळो वाटचाल । कराया प्रभो शक्ति दे आजकाल
शुभेच्छा करूं व्यक्त अशा प्रसंगीं । तयाने अघोरा मिळो धैर्य अंगीं
अशा 'षष्ठिची' वाढ हो पौर्णिमेंत । कवीचा फुलो बाग त्या चांदण्यांत
कुठें सानुलें काव्य बाराच पृष्टी । पहा सत्तरीच्या वरी जात 'षष्ठी'
तिन्हीचें जहाले कवी पंचवीस । मिळो वेल तो वृद्धिने माडवास

**–कविवर्य शं. गो. पटवर्धन, सोलापूर.**

★ पुस्तक सुबक असून अंतरंग आल्हाददायी झालें आहे. श्री. अघोर यांच्या बहुतेक कविता, जगदाळे पतिपत्नि, पोतनीस सौ. दाते, केळकर, वा. न. सरदेसाअी, विश्वासकुमार, शिरोडकर यांच्या कविता विशेष अुल्लेखनीय असून संग्रहांतील हा भाग मला विशेष आवडला. अंतर्गत परिचायक भागांवरून आपल्या कार्याची सम्यक् कल्पना येते. असें दिसतें कीं आपलें मंडळ नैमित्तिक प्रकाशन कार्याचेंच वाहन नसून परंपर या स्थिर–नित्य, असें काव्यकलेचें कमनीय केंद्रच बनलें आहे. तद्विषयक ग्रंथांचें आलयहि सजत आहे. ग्रंथाचा, स्वीकारांत आवर्जून अुल्लेख करण्याची पद्धत चांगली आहे. काव्यरचना, संपादन हा भाग चांगला असून ग्रंथ लोभनीय झाला आहे. त्याची षष्ठी करण्यांस कठोर टीकाकारहि प्रवृत्त होणार नाही. आपणांस, प्रदीर्घ भरीव सेवेस्तव धन्यवाद. गौरवास ती खरोखर पात्र आहे.

**–भा. ल. रानडे**, बी. अे. (ऑनर्स) **सांगली**

★ आपला ' षष्ठी ' संग्रह वाचला. हा संग्रह आत्तापर्यंतच्या संग्रहांपेक्षां अधिक कवींच्या सुरस व भरपूर कवितांनी भरगच्च भरलेला आहे. यांतील काव्य विशिष्ट अशा दर्जाचें असून वाचनीय व मननीय आहे. अशीच वरचेवर साहित्यशारदेची सेवा घडून आपला अुत्कर्ष होवो.

**–नारायण दामोदर काळे, पुणें**

★ आपला ' षष्ठी ' संग्रह वाचला. हल्लीच्या अडचणीच्या स्थितींत आपण जी मराठी साहित्याची सेवा करीत अहांत ती फार प्रशंसनीय आहे.

**–श्री. ज. शा. देशपांडे,** बी. अे. अेम् अेस् सी.

संपादक ' नवें नवनीत ' **मुंबअी**

★ आपला काव्यसंग्रह वैशिष्ठ्यपूर्ण होवो. आपल्या अुपक्रमास सुयश चिंतितों.

**–कविवर्य विंदा करंदीकर, मुंबअी**

★ कविता निर्मितीचा ज्याला छंद लागला, त्याला आपलें जीवित समृद्ध करण्याची गुरुकिल्ली सापडली, असें म्हणायला हरकत नाही. त्या काव्यनिर्मितींत अधिकांत अधिकांना समरस होण्याची शक्यता आली तर फारच मोठें श्रेय पदरांत पडलें, असें समजावें. आत्माविष्कार अशा रीतीने समावेशक होण्याकडे दृष्टी असावी. किमानपक्षी ' माझें अिनाम कवित्त्व ' हें समाधान लाभलें तरी बस्स आहे. जनमनांत प्रवेश करण्याची विद्या म्हणजे ललित वाङ्मय निर्मिती.

**' महाराष्ट्रकवि ' यशवंत, पुणें**

★ आपलें वाङ्मयीन कार्य प्रशंसनीय असून त्यांस मी सुयश चिंतितों. **वामनराव भाटे, बेळगाव**

★ व्यष्टि निष्ठ जीवनाची । समष्टी ही सीमा 'षष्ठी'
थेंबें थेंबें तळें साचें । यत्नें घडे काव्यसृष्टी !

**–रा. लि. मंदरकर, अुस्मानाबाद**

★ आपण आगत्यपूर्वक 'षष्ठी' काव्यसंग्रह पाठविला, त्याबद्दल आभारी आहे. कितीतरी नवकवि व कवयित्री यांचा वाङ्मयीन परिचय आपल्या या संग्रहामुळे घडला. 'षष्ठी' या काव्यसंग्रहांत पुष्कळशा कविता अशा आहेत की ज्या नामवंत नियतकालिकांची शोभा निश्चित वाढवतील. पण बऱ्याच नवजात कवितांना प्रकाशन लाभत नसल्याने, असें चांगलें वाङ्मय रसिकांच्या दृष्टीपुढे येत नाही. अशा कवि–कवयित्रींच्या कविता आपण आपल्या मंडळाच्या संग्रहांतून दरवर्षी प्रसिद्ध करून आपण अेक चांगलें वाङ्मयीन कार्य करीत आहांत. आपलें कार्य अधिकाधिक यशस्वी होत जावें, असें अिच्छितों.

**–'काव्यविहारी'**

**धों. वा. गद्रे**, बी. अे. अेल्‌अेल्. बी. **सांगली.**

★ कवित्रय मंडळाचा 'षष्ठी' काव्यसंग्रह वाचला. माझ्या कांही जुन्या नव्या कविमित्रांच्या काव्यांचा परिचय त्यामुळे मला घडला. याबद्दल मंडळास मी धन्यवाद देतों. कवित्रय मंडळाचा हा अुपक्रम स्तुत्य, स्वागतार्ह व आदरणीय आहे; यांत शंका नाही. सोलापूर हें केव्हांही आणि कोणत्याहि कार्यांत आदर्श आणि आघाडीवरच असतें. कवित्रय मंडळाचा हा अुपक्रम त्याचा अेक पुरावा आहे.

**–माधव व्यंकटेश मंगसूळीकर, साखरवाडी**

★ आपलें नवीन प्रकाशन 'षष्ठी' मिळालें, त्याबद्दल सानंद आभारी आहे. श्री. म. भि. कुलकर्णी यांच्याकडून आपला 'पंचमी' काव्यसंग्रहहि मिळाला. तोहि काव्यसंग्रह चांगला असून मला आवडला. आज 'षष्ठी' आमूलाग्र अवलोकन केली. आपल्या व अितरांच्या कविता वाचून संतोष वाटला, आपल्या काव्यसंग्रहांत प्रतिवर्षी अधिकाधिक कवींची व काव्यकृतींची भर पडत आहे. हेंच, आपलें कार्य सर्वांना आवडलें आहे, याचें गमक आहे. पौर्णिमेपर्यंतच काय पण पुढेही आपला हा साहित्य यत्न नित्य वर्धिष्णु असा होवो आणि वाचकांस व आपणांस कृतार्थता देवो, असें मन:पूर्वक अिच्छितों.

**—कॅप्टन डॉ. रा. चिं. श्रीखंडे**

अेम्. बी. ब. अेस्. **कोल्हापूर**

★ 'षष्ठी' हा सहावा काव्यसंग्रह विविध प्रकारच्या अनेक काव्यांनी फुललेला आहे. कवींची संघटणा करून त्यांची काव्यें अशी अेकत्र प्रसिद्ध करण्यांत औचित्य आहे. हें कार्य पद्धतशीरपणें सालोसाल व्यवस्थित चालू आहे. अुपक्रम स्तुत्य असून काव्यसंग्रह कौतुकास पात्र आहे.

**—'सज्जनगड' सातारा**

★ कवित्रय मंडळाचा सातवा वाढदिवस, सातवा काव्यसंग्रह आणि सात वर्षाचें अविरत कार्य, या सर्व गोष्टींच मंडळाच्या अुत्कर्षाला साक्षी आहेत. मंडळाची अेकूण कार्यव्यवस्था शिस्तीची, चिकाटीची, योजनाबद्ध आणि अत्यंत चांगली आहे. मंडळाचा प्रयत्न, मराठी भाषेच्या सेवेंतील अेक पुढचें पाअूल आहे. मंडळाच्या वाढदिवसानिमित्त मंडळाचा, संचालक मंडळाचा व श्री. भ. वा. अघोर यांचा अुत्कर्ष चिंतितों. परमेश्वर त्यांना सुयश देवो !

**—चंद्रकांत बिवरे** रा. भा. पंडित, **खोपोली**

* पंचमी काव्यसंग्रहांत १२ कवींच्या कविता होत्या, तर या 'षष्ठी' काव्यसंग्रहांत २४ कवींच्या कविता आहेत. यांवरून कवित्रय मंडळाचें कार्य लोकप्रिय होत असल्याचें अुघड होतें. निरनिराळ्या कवींच्या कविता संग्रहित केल्याने संग्रहातील कवितांमध्यें विषयांचें वैचित्र्य दिसतें. त्यांत बालगीतें आहेत, सुभाषितें आहेत, शृंगारगीतें आहेत व त्यांच्या जोडीला विनोदगर्भ कविताहि आहेत. अुल्लेखच करावयाचा तर माणूस कसा वागतो हें 'अशी माणसाची जात आहे' यांत पहावें. जीविताला आधार कशाचा हें 'जीवितनौका' सांगते. शृंगाराची चुणूक 'गुलाबी संगत' यांत मिळते. आअीचें हृदय 'वय वाढतां वाढतां' यांत दिसतें. 'ग्रामीण प्रवाशी' यांत संपाचा परिणाम दिसतो. 'आहे रविवार' यांत नोकरीवाल्यांनी आपलें प्रतिबिंब पाहून घ्यावें. जाणीवेच्या पलिकडे काय असतें हें 'नेणिवेच्या काठावर' मधें कळतें. अशा तऱ्हेने हा संग्रह अुत्कृष्ट असून मंडळाची प्रगती अुल्लेखनीय आहे. सर्वांचा अुत्कर्ष अिच्छितों.

**–बा. रा. प्रभु** बी. अे. बी. टी. **मुंबअी**

'प्रतिपदा' पासून 'पंचमी' पर्यंतचे पांच काव्यसंग्रह गेल्या पांच वर्षांत प्रकाशित करून यंदा 'षष्ठी' हा सहावा काव्यसंग्रह सहकारी तत्त्वावर प्रकाशित केला आहे. त्यांत २४ कवींच्या ६२ कविता आहेत. संग्रहातील 'टिचकी' नारायण जगदाळे; 'अुपरति' सौ. शकुंतला दाते; 'दीनबाला, झुळुक लाडकी' गोविंद केळकर; 'अमृतघट' पां. ना. कुलकर्णी वगैरे कविता त्यांतील काव्यात्मतेने वाचनीय वाटतात. कविता कशी असावी याचा निकष सांगणारी वासुदेव कुलकर्णी यांची 'कविता' संग्रहात आहे. **–रविवार, सकाळ पुणें**

★ कवित्रय मंडळ १९५४ साली स्थापन झालें. १९५५ पासून दरवर्षी प्रतिपदा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी हे काव्यसग्रह प्रकाशित झाले. यंदा षष्टी संग्रह प्रसिद्ध केला काव्य प्रसिद्धीचें जणू व्रतच कवि श्री. भ. वा. अघोर यांनी घेतलेलें दिसतें. प्रस्तावनेंत ते म्हणतात " कमी आदा आणि खर्च जादा " या सूत्रांतून हे संग्रह मी प्रकाशित करीत आहे. आणि म्हणूनच हें प्रकाशन सातत्याने निघत आहे. " षष्ठीचें बहिरंग रचना कौशल्याने ठरविलें आहे. जें साध्य झालें आहे तें कमाविण्यासाठी संपादकांना खूप श्रम करावे लागले असतील. स्वत: अघोर यांची ' अशी माणसाची जात आहे ' रमाकांत आर्ते यांची ' नेणिवेच्या काठावर ' विश्वासकुमारांची ' नव कविता ' अशासारख्या कविता मनोरंजक आहेत. षष्ठीच्या नंतर ठरविल्याप्रमाणे श्री. अघोर यांचा प्रकाशनाचा कार्यक्रम सिद्धीस जावो.

**–केसरी पुणें**

★ सोलापूर येथे दरवर्षी गुढी पाडव्याला श्री. भ. वा. अघोर हे अेक काव्यसंग्रह प्रसिद्ध करीत आहेत. चालू वर्षी षष्ठी हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. भारतातील २४ कवींनी काव्याचा मधुर आणि गोड रस वाचक वर्गास सादर केलेला आहे. अुत्कर्षास पोषक व अमोल असें कवीचें हृद्गत षष्ठीमध्यें साठविलेलें आहे. वाचकवर्गास हा संग्रह वाचनीय व संग्राह्य आहे. पैशा अभावी साहित्यिक दुर्बळ असतात. त्यामुळें आपली कलाकृती प्रकाशित करण्यांस त्यांना अवघड जाते. अशाहि परिस्थितींत श्री. अघोर यांनी षष्ठी काव्यसंग्रह प्रसिद्ध करून भारतांतील कवींना अुल्हासित ठेवण्याचें कर्तव्य बजाविलेलें आहे. त्यांचें कौतुक करण्यांस आनंद वाटतो.

चिकाटी आणि अुत्साह यांचें माहेरघर श्री. अघोर यांच्या हृदयीं आहे. त्यांच्या या वाङमयीन कार्यास वाचकांनी साह्य-करून भावी सप्तमी काढण्यास अुत्साहित करावें. अशी प्रबळ अपेक्षा व्यक्त करीत आहे. ७० पृष्टांचा, सुबक छपाअीचा आकर्षक अंक काढूनहि किंमत अल्प रु. १–२५ आहे. पानां-तील प्रत्येक काव्य पुन्हा पुन्हा वाचावेशें वाटतें.

**साप्ताहिक वनश्री नासिक**

★ सोलापूर येथील कवित्रय मंडळाच्या वतीने प्रसिद्ध झालेला हा सहावा प्रातिनिधिक काव्यसंग्रह आहे. प्रतिवर्षी महाराष्ट्रांतील प्रातिनिधिक कवींच्या कलाकृतींचें दर्शन या कवित्रय मंडळातर्फे नियमितपणें करून देण्यांत येत असून याचें बरेचसें श्रेय त्या मंडळाचे जनक, संस्थापक व संचालक श्री. भ. वा. अघोर यानांच दिलें पाहिजे. तसेच संपादक या नात्यानेहि त्यांचे प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत. मनाला जाणवणारी अनुभूती आणि त्या अनुभूतीची साकार झालेली प्रतिमा अितरांसमोर ठेवतांना कलाकाराने केलेला प्रामाणिक प्रयत्न याचा विचार केला तर जरी ती कलाकृती तुलनात्मक दृष्टचा कमीअधिक प्रमाणांत सरस अथवा नीरस असली तरी ती कलाकाराला झालेल्या साक्षात्काराची अेक मूर्त कल्पना आहे. हें विसरतां येत नाही. या काव्यसंग्रहांत देखील प्रत्येक कवीने आपापल्या परीने स्वत:च्या अनुभतीची साकार प्रतिमा मूर्त स्वरूपांत ठेवण्याचा प्रयत्त केलेला असून जरी प्रथितयश कला-कारांची संपन्नता त्यामध्यें आढळत नसली तरी नवनवीन कवींच्या कलाकृतींचें विविध दर्शन होतें आणि या नवोदित कलाकारांचें स्वागत करावेसें वाटतें. विशेषत: या कवित्रय

मंडळाकडून नवनवीन कवींना दिलें जात असलेलें प्रोत्साहन मराठी साहित्य सेवेला कौतुकास्पद असेंच आहे. यापुढेहा या मंडळाकडून अधिकाधिक कलाकारांच्या कलाकृतींचें दर्शन घडविलें जाओील आणि नवोदित कलाकारांचा परिचय करून दिला जाओील अशी आशा व्यक्त केल्यास ती अनाठायी होणार नाही. —'साहित्य सहकार' मुंबओी

★ 'कवित्रय मंडळा' चे संस्थापक, संपादक व प्रकाकश श्री. भ. वा. अघोर हे माझे सहाध्यायी. शालेय जीवनांतच त्यांनी काव्यदेवतेच्या अुपासनेला प्रारंभ केला. तेव्हांपासून त्यांची कविता पाहिली, वाचली व अैकली. कवित्रय मंडळाच्या प्रकाशनांत त्यांच्या वाट्याला थोडीफार अुपेक्षा आली, पण कवितांचा संग्रह करणें, त्यांचें प्रकाशन करून अंक काढणें हें कार्य त्यांच्या केवळ अुत्साही गुणांमुळेंच होतें. मी प्रतिपदेपासून षष्ठी पर्यंतचीं सर्व प्रकाशनें वाचलीं. यांत कवींची संख्या, कवितेची संख्या मांडवाला पोहचणाऱ्या वेलीसारखी वृद्धींगत होत आहे. पांचाचें पंचवीस झाले आहेत. यांतील कांही कविता प्रासंगिक तर कांही विविध ढंगी आहेत. त्यांत चालू काळाचा बोध आहे तर कांहींत 'शोध' आहे. कवित्रय मंडळाचें प्रकाशन, काव्यक्षेत्रांत नवोदित कवींना संधी मिळून भरीव कामगिरी करीत आहे. हें मंडळ खऱ्या अर्थानें गुढी पाडवा साजरा करीत आहे. राम जोशांचें हें गाव. विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्राच्या चतुःसीमा अेवढें विशाल क्षेत्र या कविमंडळापुढें आहे. तेव्हां 'पौर्णिमा' काव्यप्रकाशनानंतर नक्षत्र मालेच्या नांवें प्रकाशन चालू ठेवावें, ही शुभेच्छा. यामुळें तेथपर्यंत हें लोण पोहचलें जाओील.

—प्रा. गो. म. दिंडोरकर, B. A. B. Ed. सोलापूर

★ कवित्रय मंडळाचा ७ वा संग्रह निघत आहे, हें अैकून मला परम संतोष झाला. संग्रहास तिथींचीं नांवें देअून आज सतत अविरत मंडळाने धूमधडाक्याने आपलें कार्य चालविलें आहे. ही गोष्ट आधुनिक मराठी वाङमयाच्या अितिहासांत झळकल्याशिवाय राहणार नाही. आत्तापर्यंत कोणत्याहि कवि-मंडळाने असें आखीव काम केलेलें नाही. १५ तिथींच्या समाचारानंतर, कवींना प्रीय असणाऱ्या नभोमंडळांत नक्षत्रें 'क्यू' लावून बसतील, असें मला वाटतें. मंडळाचे संस्थापक संपादक व संचालक भ. वा. अघोर यांची चिकाटी, अुत्साह व धडाडी कोणालाहि स्तिमित केल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक काव्यसंग्रहांतील त्यांची प्रस्तावना नाविन्याने, कल्पना वैचित्र्याने, लालित्य गुणाने भरलेली असून मनोरंजक व चिंत्य आहे. **-पी. व्ही. कुलकर्णी, गौर**

---

## सिंहावलोकन

| संग्रह | प्रकाशनाध्यक्ष | कविसंख्या | पृष्ठें |
|---|---|---|---|
| प्रतिपदा | : कविवर्य संजीव | ३ | २० |
| द्वितीया | : ,, मा. गो. काटकर एम्. अे. बी. टी. | ३ | २४ |
| तृतीया | : श्री. नाना पाठक, एम्. अे. | ४ | २८ |
| चतुर्थी | : कविवर्य कुंजविहारी | ६ | ३४ |
| पंचमी | : श्री. गं. गो. परिचारक बी. अे अेल्अेल्. बी. वकील | १२ | ५२ |
| षष्ठी | : प्रा. कविवर्य त्र्यं. वि. सरदेशमुख, एम्. अे. बी. टी. | २४ | ७४ |
| सप्तमी | : प्रा. निर्मलकुमार फडकुले एम्. अे. | ४४ | १०० |

# वाङ्मयगंगेचा सादर स्वीकार

१ नाथाचिये द्वारीं–श्री. पांडुरंग दत्तात्रय घुगरदरे, सोलापूर
२ कल्पफुले (३) लुकलुक–भा. ल. रानडे, सांगली
४ पौर्वात्य व पाश्चिमात्य मर्दनशास्त्र | डॉ. र. कृ. गर्दे
५ सूर्योपासना आणि प्राणायाम | M. B. B. S. मुंबअी
६ पालवी (७) नव्हाळी–आ. चि. भोयर, नागपूर
८ श्रीविठ्ठल प्रदक्षिणा–श्री. पां. ना. कुलकर्णी, सोलापूर
९ सेवा, (१०) भाव–श्री. कमलात्मज, कोरवली
११ काव्यजयंति } श्री. ना. मा. तिडके परळी वैजनाथ
१२ अुत्तररात्र }
१३ मेळयातील पदें (१४) छान छान भावगीतें-दादाराव जगताप
१५ भक्तिध्वजा (१६) गुरुपाठ–श्री. कमलराम, सोलापूर
१७ सुविचार मौक्तिकमाला–श्री. वि. बा. तानवडे, कुरोली
१८ आमोद–श्री. महादेव भिमाजी कुलकर्णी, पुणें
१९ चंद्रहास आख्यान–'काव्यशारदा' सौ. लक्ष्मीबाअी नानासाहेब कुलकर्णी, सोलापूर
२० नूतन वर्ष दिनदर्शिका–श्रीसमर्थ औषधालय, मुंबअी
२१ कलिका–श्री. बजरंग सरोदे, रौंदळा

याशिवाय स. भ. मा. भि. हिरळीकर यांचें 'सज्जनगड' मासिक, संपादक जी. बी. माळी यांचें साप्ताहिक 'वनश्री' मुंबअीच्या देशस्थ ऋग्वे… हे अंक नियमित येतात. शशी, … ी अंक मुलांचे मासिक यांचे अंक…

वरील सर्वांचे आ…

REFBK-0011998

# – कवित्रय मंडळांतील कवि –

| | | |
|---|---|---|
| भ. वा. अघोर | श्रीकृष्णाग्रज | –: माजी :– |
| ना. पं. जगदाळे | सौ. सावित्रीदेवी | पोतनीस |
| सौ. कुंताबाओी | अवधूत म्हमाणे | सौ. अुषा |
| म. भि कुलकर्णी | शा. सी. धनभर | दि. देशपांडे |
| विष्णुसुत अुंब्रजकर | म. गो. गरुड | श. देशपांडे |
| कमलात्मज | म. ना. श्रीखंडे | सौ. दाते |
| रमाकांत आर्ते | त्रिवेणीकुमार | केळकर |
| सौ. कमलाबाओी | धर्मतनय | शे. कुलकर्णी |
| वा. न. सरदेसाओी | मो. ज. नसकरी | तिडके |
| पां. ना. कुलकर्णी | आ. अं. खडपकर | विश्वासकुमार |
| स. रा. शिरोडकर | अिंदिराबाओी | वा. कुलकर्णी |
| लक्ष्मीकुमार | प्र. अु. वाघमारे | तळवाडकर |
| चतुर्भुज पाटील | वसंत बापट | भावे |
| बजरंग सरोदे | चं. प बीडकर | पाटील |
| मनोहर बर्वे | यशवंतात्मज | बुध |
| वि. बा. तानवडे | जगन वंजारी | क्षीरसागर |
| सौ. रा. बोरशे | भ. ना. फड | नाथ |
| र. सी. बोरशे | डॉ. अनंतराव | कमलराम |
| श्याम | वा. मो. भिडे | व्यास |
| वि. के. देशपांडे | अनिल चांदेकर | काशीसुत |
| नी. ज. मांदाडे | शेखर | |
| सौ. लक्ष्मीबाई | गुलाब मेहरे | |

या संग्रहातील कवितांचे हक्क ज्या त्या कवीकडे.

## = अष्टमी =

या नंतर मंडळाचा 'अष्टमी' काव्यसंग्रह निघणार असून ज्या कवींना या संग्रहासाठीं कविता पाठवावयाच्या असतील त्यांनी आपल्या उत्कृष्ट कविता, प्रत्येकींच्या सुवाच्य २ प्रतींसह व २५ पैशाच्या पोष्टेजसह नोव्हेंबर १९६१ च्या पहिल्या आठवड्यांत पाठवाव्या.

## कवित्रय मंडळाचें प्रकाशित वाङमय

卐 प्रतिपदा 卐 द्वितीया 卐 तृतीया 卐 चतुर्थी
卐 पंचमी 卐 षष्ठी 卐 सप्तमी

– पुढचें पाऊल –

# अष्टमी

प्रकाशक–भ. बा. अघोर

कवित्रय मंडळ कार्यालय, नरसिंह दरबार,
सोलापूर.

मुद्रक–तुळशीदास सु. जाधव
लोकसेवा सहकारी मुद्रणालय फलटणगल्ली, सोलापूर.